# श्रीसाईलीला



स्थापना १९१६




सर्व प्रकारचें दागिने तयार करणारी मुंबईतील विश्वासू सुप्रसिद्ध पेढी

**ई. आर. मालपेकर**

जिनेकर चाळ, ठाकुरद्वार, मुंबई नं. २

टे. नं. २९६३१



# श्री साई वाक्सुधा

जो सद्वर्तनी असतो, ज्याच्यापासून सर्व प्रकारच्या दुष्ट भावना दूर पळाल्या आहेत, ज्याची आपल्या गुरूवर अढळ निष्ठा आहे, ज्यानें गुरूला सर्वस्व अर्पण केलें आहे; तसेंच ज्याच्या मनांत कोणत्याही प्रकारची फलाशा राहिलेली नाहीं त्यालाच एके दिवशीं परमात्म्याची भेट होऊं शकते. माणूस जिज्ञासू असावा लागतो; एकचित्त, एकध्यान असावा लागतो. त्याच्यावरच सद्गुरूची कृपा होते, व त्या कृपेचें फळ जिज्ञासूला मिळाल्याशिवाय रहात नाहीं.

—श्रीसाईसच्चरित्

---

# श्रीसाईलीला


[ शिरडी संस्थानचें अधिकृत मासिक ]

वर्ष ४४ वें ] जानेवारी १९६६ [ अंक १० वा

: संपादक :

श्री. बी. जी. पोतनीस

वार्षिक वर्गणी रु. ५ (ट. ख. सह)

टे. नं. ४४३२६१

: कार्यालय :

साई केतन, डॉ आंबेडकर रोड, खोदादाद सर्कल जवळ, प्लॉट नं. ८० बी, दादर, मुंबई १४.

## प्रिय वाचक—

ईश्वरानें आपणास तीन महत्त्वाची साधनें देऊन ठेविलीं आहेत. त्या साधनांचा ज्या रीतीनें आपण उपयोग करूं त्याप्रमाणें आपणास इह परलोकीं सुखाचा किंवा दुःखाचा लाभ घडणार आहे. आपण सुखी होणें किंवा दुःखी होणें हें आपल्यावरच अवलंबून आहे. कोणती हीं तीन साधनें ? शरीर, मन व वाणी. आपल्या हातून जीं कांहीं बरीं वाईट कार्यें होतात तीं या तीन साधनांच्या सहाय्यानें होतात.

मग हीं तिन्ही साधनें आपण चांगलीं कामें करण्याकडे कां बरें लावूं नयेत ? आपल्या उद्धाराला पोषक असें कार्य कोणतें ? आपलें शरीर कोणत्या गोष्टीसाठीं खपावें किंवा झिजवावें ? या जगांत सेवेसारखें सत्कार्य दुसरें कोणतेंही नसेल. ज्यांची म्हणून सेवा करण्याची आपणास संधी मिळेल त्यांची निरपेक्षपणें सेवा करणें यासारखें अन्य पुण्यकारक कृत्य दुसरें कोणतेंही नसेल. तुम्हीं कोणत्याहि उद्योगांत असा आणि उदर भरण्यासाठीं व जे तुमच्यावर अवलंबून असतील त्यांच्या रक्षणासाठीं तुम्हांला कोणता ना कोणता किंवा जो तुमच्या वाट्यास आला असेल तो उद्योग करणें हें तुमचें कर्तव्य आहे. तें कर्तव्य पार पाडीत असतां दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्याची लहानमोठी जी जी संधी मिळेल ती तुम्ही साधली पाहिजे. दुसऱ्याचें भलें करण्यांत आपण स्वतःचेंच भलें करीत असतों. ती जी निरपेक्ष सेवा तीच भगवंताची सेवा-ती सेवा भगवंताजवळ रुजू असते असें तुम्हीं निश्चित समजावें. आपण दुसऱ्याच्या उपयोगी पडलों याचा अभिमान तुम्हांला वाटण्याची मुळींच जरुरी नाहीं. त्या सेवेमुळें मनाला जो सात्त्विक आनंद होतो त्याची तुलना दुसऱ्या कोणत्याही आनंदाशीं करतां येणार नाहीं. तो आनंद हेंच तुमचें बक्षीस. दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या पारितोषिकाची तुम्हीं अपेक्षा करूं नये.

मनुष्यमात्राला अशा प्रकारच्या सेवेची संवय जडली पाहिजे. तो माणसाचा स्वभाव बनला पाहिजे. देवानें दिलेल्या या देहाचा यापेक्षां दुसरा कोणता उपयोग होऊं शकणार आहे ! देवानें हा देह दिला तो सर्वांच्या उपयोगी पडण्यासाठीं या गोष्टीची आठवण आपणास सदासर्वकाळ होत राहिली पाहिजे व त्याप्रमाणें सतत कर्तव्याचरण घडत राहिलें पाहिजे.

'मन चिंती तें वैरी न चिंती' असें म्हणतात तें खरेंच आहे. आपल्या मनाचे व्यापार आपण नेहमी ताब्यात ठेवण्यासाठी झटलें पाहिजे. मन हें ओढाळ आहे. त्याला आपण विचाराची वेसण घालून त्याला ताब्यात ठेवलें पाहिजे. मनात सदासर्वकाळ सद्विचार येत रहातील याबद्दल आपण खबरदारी घेतली पाहिजे; मन ओढून नेईल तिकडे जायचें नाहीं. त्याला भगवत् चिंतनानें नेहमीं आटोक्यात ठेवण्यासाठीं आपण जपलें पाहिजे. मनात दुष्ट, पापी, मत्सरी व स्वार्थी विचाराना जरासुद्धा थारा द्यायचा नाहीं असा निर्धार करून तुम्हीं वागूं लागला मग दुष्ट, स्वार्थी व मत्सरी विचार मनात कशाला येतील! ज्याला स्वतःच्या मनावर ताबा मिळविता येत नाहीं तो काय करूं शकणार आहे? पुरुषार्थाचें साधन म्हणजे आपलें मन. मनात नेहमीं तेजस्वी, पराक्रमी व पुरुषार्थी विचार यावे. त्याविरहीत जे विचार असतील त्यांची कठोरपणें हकालपट्टी करण्यांत यावी.

आणि आपली वाणी. या वाणीच्या सहाय्यानें माणसें जोडतां येतात, तशींच तोडतांहि येतात. आपला जन्म तोडण्यासाठीं नाहीं तर जोडण्यासाठीं आहे. सर्वांना रुचेल, सर्वांना आनंद होईल, सभोंवारच्या लोकांना स्फूर्ति देईल असेंच बोलायचें, वायफळ बोलणें बोलायचें नाहीं. मधुर, हितकर व कल्याणदायक असेल तेंच बोलायचें.

पूज्य साईबाबांचें सारें जीवन आपण बारकाईनें पाहिलें असता आपणास हेंच दिसून येईल. ते आमच्यांत वावरले, आमच्या सुखदुःखाशीं समरस झाले, ते कशासाठीं? आमच्या सुखासमाधानासाठीं. वेळोवेळीं नाना प्रकारचे दाखले देऊन त्यांनीं आमचें मार्गदर्शन केलें, आमची दुःखें स्वतःवर ओढून घेतलीं, आमच्यावर संकटें आलीं असतां तीं दूर करण्यासाठीं ते झटले, अशा रीतीनें सेवाभावाचा, व दुसऱ्याच्या सुखदुःखांशीं समरस होण्याचा उच्च आदर्श सतत दृष्टीपुढें ठेविला आहे. तो उच्च आदर्श सतत दृष्टीपुढें ठेवून त्या प्रकाशांत आम्ही वावरूं लागलों तर त्यांतच आमचा उद्धार आहे.

—संपादक

# संतोष

संतोष ! केवळ तीन अक्षरी शब्द ! परंतु त्या शब्दांत केवढी जादू भरलेली आहे ! मनुष्यानें नेहमी संतोषी रहावें; कारण त्यांतच सारें सुख व आनंद सामावलेला आहे. मन कसें नेहमी प्रसन्न असावें, कसलीही भगभग त्याच्यामागें नसावी. संतुष्ट कोण समजायचा ? जो मनुष्य ईश्वरानें दिलेल्या स्थितींत समाधान मानून रहातो तो. प्रसन्नता, संतुष्टता ही एक मनाची अत्यावश्यक अवस्था आहे. ती अवस्था ज्याला प्राप्त झाली तो या जगांत खरा सुखी. माणसाचें कल्याण संतुष्ट रहाण्यांतच आहे.

हत्ती, घोडे, हिरेमाणकें व धनदौलत आपल्याजवळ विपुल प्रमाणांत असली म्हणजे आपण सुखी झालो असें समजायचें का ? ज्याच्याजवळ तीं साधनें आहेत ते सुखी आहेत का ? हीं साधनें तुम्हांला सुख देऊं शकत नाहींत. त्याहीपेक्षा महत्त्वाचें असें एक साधन आहे. तें तुमच्याजवळ ज्या प्रमाणात असेल त्या प्रमाणांत तुम्ही सुखी. तें साधन म्हणजे संतोष, समाधान. 'तेंच तयाचें अर्चन समाधान सर्वभुतीं.'

रामदास स्वामींनी म्हटलें आहे कीं, 'समाधानें समाधान वाढे, मैत्रीनें मैत्री वाढे,' आपण आपली वृत्ती नेहमीं समाधानी ठेवण्यासाठीं जगलें पाहिजे. हत्ती, घोडे, रत्नालंकार यांच्यामुळें आपणास सुख मिळेल असें ज्याला वाटतें, त्याचें तें वाटणें अत्यंत चुकीचें असतें. संतोष हेंच सर्वांत मोठें व प्रत्येकानें वाछनीय असें धन आहे. बाकीचीं धनें कधीं ना कधीं मनात असंतोष व असमाधान उत्पन्न करणारी म्हणून त्यांचा पाठलाग करूं नये.

द्रव्यप्राप्ती करण्याच्या मार्गें आपण लागतों. त्याचा आधार असतो लोभ. द्रव्य कितीहि मिळालें तरी लोभ वाढतच जातो आणि संतोष सुखाचा आधार असतो. तेव्हां लोभ आणि त्याग या दोहोंपैकीं तुम्ही काय पत्कराल ? त्याग करण्यांत सुख व आनंद यांचा लाभ होतो.

दुसऱ्यापाशीं असलेली वस्तू मला मिळावी असा लोभ बाळगणारीं माणसें या जगांत सर्वत्र आढळून येतात. ज्याच्या जवळ एखादी वस्तू असते त्यालाहि तिचा लोभ असतोच. त्या बळावर तो म्हणत असतो कीं, छे ! मी कदापि ती वस्तु दुसऱ्यास देणार नाहीं. असा हा सतत झगडा चालू असतो व तो असंतोष निर्माण करीत असतो. त्यावरून आपण सावध राहिलें पाहिजे.

# आपल्या लोकांचा धर्मसंशोधनाकडील कल

पाळिलों पोषिलों सर्वस्वी अजिवरी ।
वागविलों करीं धरोनियां ॥ १ ॥

आतां काय माझा धडेल अव्हेर ।
मागें बहु दूर वागविलें ॥ २ ॥

नेदी वारा अंगीं लागों अघाताचा ।
घेतला ठायींचा भार माथां ॥ ३ ॥

तुका म्हणे बोल करितों आवडी ।
अवीट तेचि गोडी अंतरीची ॥ ४ ॥

ह्या अभंगांत तुकारामबावा देवाला आळवून काय म्हणतात तें पाहूं या, ते म्हणतात कीं, ज्या मला त्वां आजपर्यंत सर्वस्वी पाळिलें, पोषिलें व हातांत धरून वागविलेंस, तसेंच मागें लांबपासून बहुत दूरवर तूं मला वागवून आणिलेंस, त्या माझा तूं आतां अव्हेर करिशील काय? मुळापासून तूं माझा सर्व भार आपल्या शिरावर घेऊन संकटाचा, किंवा आघाताचा वाराहि लागूं दिला नाहींस असा जो तूं तो आतां माझा अव्हेर करिशील काय? असें कधींहि होणार नाहीं.

याच धोरणावर, पण दुसऱ्या समजुतीनें, आज वरील अभंगाचें विवेचन करावयाचें आहे. सामान्यतः मार्गदर्शक जो असतो तो हातीं धरून वाट दाखविणारा असतो. आणि वाटसरूचा बोजा आपल्या डोईवर घेऊन चालणारा मार्गदर्शक त्याहूनहि विरळा. ज्याचा बोजा त्याच्या माथ्यावर असाच प्रकार बहुधा आढळतो. आपल्या व अन्य धर्मीच्या लोकांत मुख्य फरक हाच आहे कीं, आम्ही पूर्वीपासून देवावर सर्वपरी भार ठेवीत आलों आहों; तशा प्रकारें निदान तितक्या मानानें इतर लोकांनीं केलेलें आढळत नाहीं. याच कारणानें आपल्या हिंदु लोकांविषयीं चांगल्या बुद्धीनें विचार करणारे, केवळ टवाळकीनें बोलणारे नव्हत, असे लोक एक आक्षेप घेतात तो हा कीं,' तुम्हां हिंदु लोकांमध्यें धर्मसंबंधानें उठाठेव व बाटाबाट करण्याची संवय दिसण्यांत येते ती कां? एक थोर पार्शी गृहस्थ, पुण्याचे' खानबहादुर दोराबजी पदमजी, कांहीं दिवसांमागें भेटले होते. त्यांनीं हाच सवाल केला कीं, इतर लोकांचे धर्मसंबंधी आचार, मतें व संप्रदाय, तसेंच सामाजिक अथवा कुटुंबव्यवस्थेच्या संबंधाचे आचारविचार सर्वच अति शुद्ध असतात, आणि त्यांमध्यें दोषाचा भाग मुळींच नसतो असें नाहीं; तर कोणांत दोष कमी, कोणांत

अधिक, असा तारतम्याचा भाग मात्र असतो. मग हिंदु लोकांच्याच मोवर्ती हें काय घुमते आहे? तुम्ही नवीन नवीन धंदेरोजगार शोधून काढावे, देशाची संपत्ति वाढवावी तें सोडून बौद्धधर्ममार्गें धर्मसंबंधीं अथवा सामाजिक बाबतींत चालण्यात होणारे त्रास व अडचणी व लोकनिंदा आपणावर ओढून आणण्याची पंचाईत का करितां?

इतर धर्मांच्या लोकांनी धर्मसंबंधीं सुधारणा केली, तरी ते देवळें बांधून आमच्याप्रमाणे चर्चा करीत बसले नाहींत, हें खरें आहे; आणि त्याअर्थी ह्या आक्षेपाचा विचार व त्याचें समाधान करणें इष्ट आहे. एका पुरुषास एकदम अनेक स्त्रिया असण्याच्या संबंधानें महंमदी धर्म आपल्यापेक्षां अधिक सदोष आहे, तरी त्याच्या दूरीकरणार्थ व्यवस्थित सभा स्थापन होऊन, चळवळ करण्यात आलेली कोणाच्या आढळण्यात आहे काय? नाहीं. यावरून हें उघड दिसतें कीं, या आपल्या जन्मभूमीची खाणच आहे कीं, असल्या गोष्टीत इतर लोक जसे उदासीन राहतात, अथवा बुद्धीस वाटेल तसें करितात तसें आपणास करून चैनच पडावयाचें नाहीं. इतर लोक अशा गोष्टीत तटस्थ किंवा उदासीन असतात, अथवा मुळींच लक्ष पुरवीत नाहींत, परंतु आम्हांस उपद्याप पाहिजे. आपले दोष सर्व लोकांपुढें का मांडावे व एकमेकांविषयीं बिकीर कां वाढवावी, असा आपल्या मनात जणूं विचार येतच नसतो; इतर लोक लौकिकार्थ, साधनाच्या प्राप्त्यर्थ अथवा आपली औद्योगिक अथवा सांपत्तिक स्थिति सुधारण्यासाठीं चळवळींत पडतात. आपल्या हिंदु लोकांचा विचार याच्या उलट असतो, असें म्हणावयास हरकत नाहीं. आपल्या लोकांच्या अंगात धर्मसंबंधीं बाबतींत चळवळ करण्यात एक प्रकारचें स्फुरण चढत असतें. आणि आपल्या मनाची आपल्या-मागें टोंचणी असते, ती आपणास स्वस्थ बसू देत नाहीं. पण हा दोष म्हणा, किंवा गुण म्हणा, आजकाल लागलेला आहे असें नाहीं.

आधुनिक काळांत बाळशास्त्री जांभेकर व दादोबा पांडुरंग यांच्या वेळेस ही चळवळ नव्हती असें नाहीं. ही करण्यात व्यर्थ कालक्षेप व पराक्रमाचा अपव्यय होतो, असें वाटून इतर लोकांस व आपणापैकींही कित्येकांस दोष दिसतो. अर्थात् ज्या धर्म-संबंधीं व सामाजिक बाबतींचा परस्परांशीं आपल्या लोकांमध्यें अतिनिकट संबंध असतो, त्यांत सुधारणा करण्याविषयीं इतकी खटपट व इतका हट्ट कां, हा प्रश्न सहजच निघतो आणि त्यांत काहीं अर्थ नाहीं, किंवा तो विचार करण्यासारखा नाहीं असें नाहीं. एक गोष्ट निर्विवाद आहे कीं, ही उठाठेव करण्याची संवय, सदोष असो वा निर्दोष असो, तिला चांगला गुण माना, अथवा वाईट खोड माना, पूर्वीपासून चालत आलेली आहे. असा प्रकार, अशी समजूत, आतां पाश्चत्य शिक्षण मिळाल्याचा परिणाम नसून पूर्वीपासून आहे. हें नवीन बंड उपस्थित झालेलें नाहीं, हें आपल्या देशाचा इतिहास पाहिला असतां बौद्ध, जैन हे धर्म तसेच शांकर, रामानुज, माध्व, वल्लभ व स्वामिनारायण हे एकामागून एक झालेले संप्रदाय याच गोष्टीची साक्ष देतात. नाना प्रकारचे उद्योग,

जलपर्यटण, यांत्रिक कला सामर्थ्य प्राविण्य, इत्यादि गोष्टींतून लक्ष कमी होऊन देवाचा सहवास व्हावा, त्याच्याशीं लडिवाळपणाचे बोल बोलावे, देवाचा व आपला संनिकट संबंध मनात आणून त्यास आळवावें, एतदर्थ प्रयत्न करण्यास व नवीन नवीन धर्मव्यवस्था करण्यातच आपला ऐतिहासिक काल गेला आहे, असें आपणांस दिसून येईल. ही धर्मसंबंधीं चळवळ करण्याची चाल आरंभापासून आहे आणि ती कबीर, नानक, चैतन्य, तुकाराम इत्यादिकांच्या चरित्रांवरून सिद्ध होते. देशात अनेक वेळां राज्यक्रांति झाली, बहुत राजे आले व गेले; परचक्रें आलीं गेलीं; परंतु या कारणामुळें आपल्या लोकसमजास धर्मसंबंधीं बाबतीत चळवळ करण्याची जी संवय पडलेली आहे तिजमध्यें फरक झालेला, किंवा तिचें रूपांतर झालेलें आढळत नाहीं. विदेशी व विधर्मी लोक येथें सत्ताधारी झाले, त्यांपैकीं कित्येक येथले स्थानिक झाले, तरी जसे तांदळात मिसळलेले मूग पाटावर घातले असतां अगर सुपात घालून घोळले असतां वेगळे होतात, तद्वत् आमचे हिंदु लोक त्यांपासून अलग राहिले. हजारों वर्षांपासून आपल्या लोकाची समजूत ही कीं, आपल्या दुःखाचा व संकटाचा भार सर्वपरी देवाच्या डोकीवर घालावा, म्हणजे काकळूत येऊन तोच त्याचा परिहार करितो. कित्येक लोकांस ही समजूत व तिच्यामुळें उद्भूत होणारी धर्मसंबंधीं बाबतींतच चळवळ करण्याची मनाची प्रवृत्ति ही प्रापंचिक बाबतींत प्रत्येक प्रगतीस अवरोध व र्‍हास करणारी असें वाटतें; तरी ती आमच्या हाडींमासीं इतकी मुरलेली आहे कीं, ती आमचें भाग्य होऊन राहिली आहे आणि आमचा उदय झाला तर तद्द्वाराच व्हावयाचा असें दिसतें.

इंग्रजी शिक्षणाचें हें फळ, अथवा ही नवीन टूम म्हणणें निवळ चुकीचें आहे; हा प्रकार परंपरेनें चालत आलेला असून धर्मसंबंधीं व त्याला चिकटून असणाऱ्या सामाजिक बाबतींत अधिक जिकीर असणें ही स्थिति, आम्हा लोकाची आरंभापासून स्वाभाविक आहे. हा देहस्वभाव चांगला आहे, किंवा त्याचें खंडन व्हावें हें बरें, हा निराळा मुद्दा आहे आणि याविषयीं मतभेद असू शकेल. आपण नावें ठेवितों, दुसऱ्याकडून ठेवून घेतों व तंटे भांडणें वाढवितों; यापेक्षा ज्याच्या त्याच्या बुद्धीस रास्त व उचित वाटेल तें धर्मसंबंधीं अथवा सामाजिक गोष्टीत ज्यानें त्यानें मुकाट्यानें करावें आणि औद्योगिक स्थिति सुधारण्याकडे मन वळवावें हें बरें, असें दुसऱ्या देशांतील व धर्मांतील लोकांस वाटो व आमच्यामध्यें आपआपसात अधिकार आणि योग्यता ह्यांच्या योगानें या संबंधानें न्यूनाधिक भाव असो; पण, आपणांमधील जे लोक धर्मसंबंधीं व सामाजिक सुधारणा करण्यास झटणाऱ्यांस तुम्ही इतके हट्टवादी का होता असा प्रश्न करितात, त्यांस आमचा उलट सवाल हा आहे कीं, होय. आम्ही आग्रही, हट्टी आहों खरे, पण तुम्ही तसे का होतां ? आमची धर्मसंबंधीं सुधारणेची दिशा वेगळी असो; पण तुमचा तरी त्यासंबंधानें आग्रह कां ? यावरून असें सिद्ध होत नाहीं काय कीं, धर्मसंबधीं चर्चा, विवेक व भांडणें हेंच या देशाचें स्वरूप, हाच येथील जणू काय हवापाण्याचा गुण आहे ? ब्रह्मबांधव उपाध्याय

ज्यांचे बंगाली गृहस्थ सिंघ हैदराबादेहून येथें आले होते; त्याची गांठ पडून याच संबंधानें संभाषण झालें. हे मूळचे हिंदु धर्मानुयायी असून नंतर ब्राह्म झाले व नंतर धर्मांतर करून रोमन कॅथॉलिक पंथाचे ख्रिस्ती झाले. त्यांच्या चरित्रावरून व मतांवरून धर्मचर्चाच आमच्या लोकांस सर्वांत प्रिय आहे, असेंच सिद्ध होतें.

या गोष्टीला, ह्या स्वभावाला उपायच नाहीं. आमचें जात्या लक्षणच असें आहे. जसें भात आणि नारळ व जोंधळा आणि बाजरी, कोंकण; देश व गुजराथ यात अनुक्रमें पिकत असतात आणि याला जमिनीचा गुण कारण आहे, तसा या देशाचा धर्मसंबंधी चळवळीच्या बाबतींत प्रकार आहे. हें स्वरूप, हा उद्योग चांगला आहे कीं नाहीं, हा निराळा मुद्दा आहे. देवाचा आपणांवर विशेष लोभ आहे, असें आपले लोक इतर धर्मांच्या लोकाप्रमाणें मानीपणानें, अभिमानानें, अथवा अव्यवस्थित रीतीनें मानीत आलेले नाहींत, ही गोष्ट या संबंधानें आपण लक्षात ठेविली पाहिजे. यहुदी लोकामध्यें आपण परमेश्वराचे आवडते अशी समजूत आहे. पण, त्याच्यापेक्षा इतर, निदान विस्तारानें जास्ती व अधिक निर्मळ, शुद्ध अशी आपल्या लोकांची समजूत आहे. आणि हाच आपला विशेष गुण आहे. देवाचा व आपला सनिकट संबंध आहे; संसारांतील अरिष्टांत व दुःखात देव आपला पाठीराखा आहे; त्याच्यावर भरवसा ठेविला असता तो आपला सर्व भार वाहील, कधीं अव्हेर करणार नाहीं, ही बुद्धि प्रत्येकाच्या ठिकाणीं जागृत आहे; हा विश्वास दृढ आहे; हें आपल्या लोकांचें भाग्यच समजलें पाहिजे. हा उपजत अंगस्वभाव, हा विशेषपणा टाकून देता येत नाहीं, तर तो शुद्ध मार्गानें जाईल, अशी योजना केली पाहिजे, असें त्यास वळण दिलें पाहिजे; आपल्या अंगीं साहस, पराक्रम, सामर्थ्य वाढविण्यासाठीं निरंतर प्रयत्न केला पाहिजे. पण, तें या अंगस्वभावास चांगली दिशा लावून होण्यासारखें आहे आणि झालें पाहिजे. नाहीं तर साबण लावून काळ्याचें पांढरें करावयास केलेली खटपट पाण्यात जाते तसें होईल. हें माप पदरीं पडतें खरें; परंतु त्यासाठीं खेद मानण्यास कारण नाहीं असें मला वाटतें. हा स्वभाव, किंवा हा विशेष चाळीस कोट प्रजेच्या अंगीं ठेवून देव तिला फुकट जाऊं देईल, असें सहसा मानवत नाहीं. आपल्या लोकातील निरनिराळ्या पंथाचा मार्ग वेगळा असला, तरी सर्वांचा दृढ विश्वास वरील अभंगांत तुकारामबावानीं वर्णन केल्याप्रमाणें असल्याकारणानें उद्देश एकच असतो. सारांश, धर्मसंबंधीं चर्चा व चळवळ आपल्या लोकांत कोणत्या ना कोणत्या रूपानें अथवा दिशेनें पूर्वीपासून चालत आलेली आहे; ती नवीन शिक्षणाचा परिणाम आहे किंवा आजकालची आहे असें नाहीं. आतां धर्मविषयक बाबतींत उदासीनता आपल्या लोकांस श्रेयस्कर कां वाटत नाहीं, याचा ज्याचा त्यानें आपल्या ठिकाणीं विचार करावा.

---

# दोन देवभक्तांची कथा

**पूर्वसमुद्राच्या काठीं वड्याजगन्नाथ क्षेत्राचा सात्विक राजा ईश्वरभक्तीविषयीं प्रख्यात होता. तो देवाची तिन्ही त्रिकाळ पूजा अर्चा करी. तो उदार होता व सर्व प्राणिमात्रांना अन्नदान करण्यांत दक्षता बाळगीत असे.**

एके समयीं तो सात्विक आपलें नित्यकर्म आटोपून कांहीं करमणूक व्हावी म्हणून महाद्वारांत जाऊन द्यूत खेळत बसला. द्यूताचा रंग भरला असतांना तो सात्विक एकाग्रतेनें द्यूतामध्यें अगदीं गढून गेला. अशा समयास त्या ठिकाणीं देवाचा पुजारी प्रसाद वाटण्याकरितां आला. सर्व मंडळींनीं प्रसाद घेतला. राजाची पाळी येतांच राजानें आपलें चित्त व नेत्र खेळांतच ठेवून पुजाऱ्यापुढें नुसता डावा हात पसरला. पुजाऱ्याला तो प्रकार विपरीत वाटून तो डाव्या हातावर प्रसाद न ठेवितां तसाच निघून गेला. खेळण्याच्या नादांत राजाला या गोष्टीचें कांहीं भान नव्हतें. द्यूत संपूर्ण होतांच राजानें प्रसादाची चौकशी केली तेव्हां मंडळींनीं राजाला पुजाऱ्याबद्दलचा सर्व मजकूर विदित केला. तो वृत्तांत ऐकून आपण प्रसादास अंतरलों अशा समजुतीनें राजा फार दुःखित झाला. त्या दिवसापासून राजानें देवाच्या गाभाऱ्यांत जाण्याचें बंद केलें. एखाद्या चुकार सेवका-प्रमाणें त्याची वृत्ति होऊन तो लाजेनें महाद्वारांतच तिष्ठत असे. आपण प्रसाद घेण्यास हयगय केली आणि त्याकरितां बेगुमानपणानें वामहस्त पुढें केला याबद्दल त्याला मोठा पश्चात्ताप वाटला. त्यानें उजव्या हातास अपराधी या नात्यानें शिक्षा करण्याचा संकल्प केला.

त्यानें आपल्या प्रधानाला एकांतांत नेऊन असें सांगितलें कीं, "मी आपल्या मंदिरांत शयन केलें म्हणजे त्या ठिकाणीं कोणी पिशाच्च येऊन खिडकीवाटे आंत हात घालून मला डवचतें. या गोष्टीची मला फार भीति वाटते, तरी तूं मंचकाशेजारीं उभा रहा. पिशाच्चाचा हस्त आंत येतांच तो तूं तोडून टाक."

राजाचें भाषण प्रधानजीला खरें वाटलें. तो हातामध्यें तरवार घेऊन मंचका-शेजारीं दडून बसला. राजानें गवाक्षद्वारांतून आपलाच उजवा हात आंत घातला. हात पाहतांच प्रधानानें आपल्या शस्त्रप्रहारानें तो तात्काळ छेदून टाकिला.

हात तुटून खाली पडताच प्रधानानें तो उचलण्याकरितां त्याजवर नजर टाकली. तो हात खुद्द राजाचाच आहे असें ध्यानात येताच प्रधान मोठमोठ्यानी शोक करूं लागला. त्याचा विलाप ऐकताच राजा बाहेरून आत आला आणि प्रधानाचें समाधान करण्याकरिता बोलला. " प्रधानजी, आपण स्वस्थ असा. तो उजवा हात अपराधी व माझा शत्रु असल्यानें मी आपल्या खुषीनेंच त्याला ही शिक्षा दिली आहे." इतकें सांगून राजानें सेवकाकरवीं तो हात पालखींत घातला आणि तो आपल्या सेवकांना म्हणाला " तुम्ही ही पालखी घेऊन देवळात जा व जगन्नाथाला माझा असा निरोप कळवा कीं, मी फासे खेळण्यांत गुंतलों असताना ज्या हातानें प्रसाद घेण्याची हयगय केली तो तुमचा अपराधी हात तुमच्याकडे पाठवून दिला आहे. सर्व कर्मेंद्रियात मला हा हातच गुन्हेगार वाटला. प्रभूच्या सेवेंत अंतर करणारा, द्यूतासारख्या निषिद्ध कर्मांत फासे फेंकणारा, वनामध्यें श्वापदांचे जीव घेणारा, असा हा दुर्जन, खळ, पापी व दुराचार करणारा हात तुमच्याकडे पाठवून दिला आहे. त्याला योग्य तें शासन करावें."

राजाच्या आज्ञेप्रमाणें दूतांनीं ती पालखी महाद्वारांत नेली आणि राजाच्या निरोपाचा पुनरुच्चार केला. दूतमुखातून राजाच्या निरोपाचा उच्चार होताच वैष्णवानीं त्या हातावर बुका व फुलें उधळलीं. राजाची विरक्ति व देवावरील भाव पाहून सर्व जन त्याला धन्यवाद देऊं लागले. याला म्हणावें दृढ भक्ति ! नाहींतर ईश्वराची उपासना करणारे असंख्य जन दृष्टीस पडतात; पण त्यांच्या चित्तांत या सात्विकी राजाप्रमाणें विमलभाव नसल्या कारणानें त्याच्या उपासनेचें सार्थक होत नाहीं. उदरपोषण करण्याकरितां देशाटन करून भलभलत्याच कृत्यांत प्राण खर्ची घालणाऱ्यानीं ईश्वरोपासनेंत जीव अर्पण करण्याचा बेत ठरविला तर त्याच्या हातून किती तरी अद्भुत कर्मे होतील; पण प्रपंचलोलुप व विषयांध जनाना परमेश्वरोपासनेचा मोठेपणा रुचणार कसा. त्यांना मुख्य हरिनामाचा कंटाळा. तापानें पछाडलेले दुःखी लोक ज्वरहरणार्थं चवदा चवदां लंघनें करतील, पण एकादशीचा एक उपास करून महत्पुण्य पदरांत पाडून घेण्यास मात्र तयार होणार नाहींत. एका कवडीकरिता आंतगणांत जीवजाईपर्यंत भांडत बसणारे लोक हरिगुणाचा एकदां देखील उच्चार करण्यास कबूल होत नाहींत. घरावर दरोडा पडला असता हातावर हात चोळून स्वस्थ बसणारे हजारों सापडतील, परंतु सत्पात्राच्या हातावर खुषीनें एक पैसा टाकणारा एखादाही सापडावयाचा नाहीं. नाशवंत शरीर आणि संपत्ती यांच्या मोहात गुंतून स्वहितास मुकणाऱ्या लोकांची जगतात दाटी असणें हा कलीचा महिमा आहे. हा सात्विक राजा तसा नसून फार निष्ठावंत व सुकृतवान होता. देवळांतील वैष्णवजन त्याचें गुणवर्णन करीत आहेत तों त्या ठिकाणीं असा चमत्कार घडला कीं, पालखीमधल्या त्या तुटक्या हाताचा तेथल्या तेथें दवणा झाला. पुजाऱ्यानें तो दवणा उचलून तात्काळ पुष्पवाटिकेंत

लावून टाकिला. नंतर पुजारी देवाचा प्रसाद घेऊन त्या राजाकडे गेले. राजानें प्रसाद घेण्याकरितां तो थोटा हातच लांब करण्याचा यत्न केला तों त्याचा हात पूर्वीप्रमाणें होऊन त्यानें प्रसाद ग्रहण केला. हें आश्चर्य पाहून सर्वांनीं हरिनामाचा जयजयकार केला.

याच पुण्यवान जगन्नाथ क्षेत्रांत कोणी कर्माबाई नांवाची एक ब्राह्मण स्त्री राहत होती. ती हरिभक्ति करण्यात रंगलेली असे. कर्माबाई गरोदर असताना तिच्या भ्रतारास काळानें ओढून नेलें. पतिनिधनामुळें तिला अपरंपार दुःख झालें. कांहीं काळानें ती प्रसूत होऊन तिला मुलगा झाला. तो मुलगा मोठा होऊन त्याचें लग्न झालें. पुढें कर्माबाईची सून गरोदर झाली तेव्हा तिला बहुत समाधान वाटलें. स्नुषा बाळंत होऊन तिलाही पुत्र झाला. नातू झाल्याच्या आनंदांत कर्माबाई सुख मानते आहे तोंच तिचा मुलगा पंचत्व पावला. पुत्रदुःखानें कर्माबाई होरपळून निघाली तरी ती समाधान मानून त्या नातवावरच जीव लावून राहिली. कांहीं काळानें कर्माबाईचें नातवंडही शांत झालें. नातवाच्या मृत्यूनें मात्र कर्माबाई पूर्ण निराश झाली. तिची सर्व उमेद खचली. तिला सर्व संसार निःसार भासून ती आपल्या जन्माबद्दल ईश्वराला गाऱ्हाणें सांगूं लागली.

या समयास क्षेत्रामध्यें कांहीं संत यात्रेकरितां प्राप्त झाले. त्यांनीं कर्माबाईच्या घरांतच बिऱ्हाड दिलें. घरची मालकीण कर्माबाई सदा उदास दिसते असें जाणून संतानीं तिला तिच्या चिंतेचें कारण विचारिलें. कर्माबाईनें त्याना आपला कर्मइतिहास सांगितला. संतांनी लागलीच तिला संसारांतील दुःखरूप यातनांचा विचार समजावून दिला. संसारातील सर्व सुख स्वप्नवत् असून तो संसार नाशवंत आहे असें संतमुखांतून ऐकतांच कर्माबाईचें चित्त द्रवलें. ती संतांच्याच चरणीं लागली.

पतितांचा उद्धार करण्यास मृत्युलोकीं अवतीर्ण झालेले संतसाधु आपल्या चरणीं नत झालेल्या जडमूढांचा उद्धार केल्यावाचून कसे राहतील ! त्या संतानीं कर्माबाईस एक लहानशी गोपाळमूर्ति अर्पण केली आणि पुत्र व नातू याच्याप्रमाणें त्या मूर्तीवर प्रेम करण्यास सांगून संतजन आपल्या वाटेनें निघून गेले.

कर्माबाईला त्या मूर्तीचें वेड लागून राहिलें. ती त्या मूर्तीला लहान अर्भकाप्रमाणें सर्व उपचार करूं लागली. ती त्या गोपाळास न्हाऊं घालून पाळण्यात निजवी, त्याला दूध पाजी, वाटीमध्यें दहीभात कालवून ती त्याला जेवूं घालण्यास बसे. तिचा खरा भाव पाहून ती गोपाळमूर्ति खरोखरीच जेऊं लागली.

हा प्रकार चालू होऊन कांहीं दिवस लोटल्यानंतर कर्माबाईच्या घरी कांहीं अग्निहोत्री ब्राह्मण येऊन वस्तीस उतरले. त्यानी कर्माबाईची कृति पाहून तिला सांगितलें कीं, " अशा प्रकारें केलेली सेवा देवाला रुजू होत नाहीं. स्नान केल्यावाचून कृष्णपूजा करूं नये. ओंवळ्यानें दाखविलेला नैवेद्य देव स्वीकारीत नाहीं. "

अग्निहोत्र्यांच्या उपदेशाचे वर्म समजून ती कर्माबाई दुसऱ्या दिवशीं सडा, समार्जन, धुणें, स्नान, वगैरे कृत्य उरकून मग स्वयपाकास लागली. तिच्या घरकृत्यामुळें देवाच्या नैवेद्यास फार उशीर झाला. तेव्हां जगन्नाथानें पुजाऱ्याच्या स्वप्नांत जाऊन सांगितलें कीं, "कर्माबाईच्या घरांत वस्तीस उरलेल्या कर्मठ ब्राह्मणांनीं तिच्या मनात विकल्प उत्पन्न केल्याकारणानें मला जेवणाला फार उशीर होतो. तरी तुम्ही जाऊन तिला समजावून सांगा आणि नैवेद्य लौकर मिळेल असें करा."

परमात्मा शुद्ध चैतन्य असून मायातीत असल्यामुळें त्याला कर्माचें बंधन असणें शक्य नाहीं. सर्व कर्मे करून स्वतःकडे अकर्तेपण घेणारा विश्वव्यापक परमात्मा कधकाळीं कर्माच्या योगानें बद्ध होत नाहीं, ही गोष्ट सत्य मानून तो पुजारी अनेक भक्तजनासह कर्माबाईच्या घरीं गेला. दृष्टांताप्रमाणें त्यानें तिला सूचना दिली. त्याच्या सूचनेप्रमाणे कर्माबाईनं लागलीच पाक करून गोपाळकृष्णापुढें नैवेद्य ठेविला. त्या शुद्धभावी कर्माबाईचा नैवेद्य प्रभुने सर्वांच्या देखत आपल्या मुखात घातला.

अग्निहोत्र, यज्ञयागप्रसंगींही जो परमेश्वर स्वतः नैवेद्य खात नाहीं, नाना योगक्रियानाहि जो सापडत नाहीं, सोवळ्या ओवळ्याच्या कटकटीनें शुद्धभावास मुकलेल्या कर्मठाच्या कर्मासही जो गवसत नाहीं तो परमात्मा कर्माबाईसारख्या अनन्य बाईच्या घरीं माणसासारखा जेवितो हा भक्तिमहिमा होय. शुद्धभावनारहित माणसाला ही भक्तीची खूण कधींहि समजावयाची नाहीं. या गोष्टीचें कोडें उलगडून घेण्याची जर कोणास इच्छा असेल तर त्यानें अहंभावाचा त्याग करून हरिभक्तिपुढें लीनच व्हावयास पाहिजे. चतुराननासहि ज्याचें समग्र वर्णन करितां येत नाहीं त्या परमात्म्यास नैवेद्य दाखविण्यापूर्वी कर्माबाईची खिचडी यावी लागते अशी जगन्नाथक्षेत्रांत आद्यापर्यंत साक्ष चालू आहे.

---


# लहान मुलांच्या आंकडीवर

## जुनें आणि प्रसिद्ध औषध

## जयकर्स चिल्ड्रन्स कन्व्हलशन् रेमेडी

सोल प्रो. जयकर ब्रदर्स, ६६, मरीन ड्राईव्ह, मुंबई १.

: स्टॉकिस्ट :

कांचनलाल वाडीलाल कं. — दवाबझार, मुंबई २.

# आदर्श पुत्र लव आणि कुश

रामवंशाचे उत्तराधिकारी लव-कुश आहेत, त्यामुळें पुष्कळ लोक आम्ही लव-कुशांच्या वंशांतील—सूर्यवंशी आहोंत असें अभिमानानें सांगतात. वाल्मीकींनी सुरवातीला स्वतःचा रामायण लिहिण्याचा हेतु सांगितला आहे, त्यामुळें उत्कृष्ट मानवव्यवस्था आणि आदर्श चरित्रमूर्ति रामाचा जगापुढें चारित्र्याचा आदर्श म्हणून ठेवून वाल्मीकि स्वतःला कृतकृत्य मानीत आहेत. त्यामुळें जातां जातां पराक्रमी असलेल्या शूरवीर लवकुशांचें वर्णन करीत आहेत.

अत्यंत लहानपणीं त्यांनीं रामायण तोंडपाठ केलें होतें. वाल्मीकि त्यांच्याजवळून तें ऐकून घेतात. वाल्मीकींनीं त्यांना शस्त्रविद्या, धनुर्विद्या, क्षात्रधर्म, वगैरे शिकविलें होतें. भवभूतीनें लवकुशांचें सुंदर वर्णन केलें आहे. अश्वमेधयज्ञ एकच क्षत्रिय चक्रवर्ति राजा आहे याचें प्रतीक म्हणून करण्यात येई. समुद्रापर्यंत पृथ्वीवर फिरत फिरत रामाच्या अश्वमेधयज्ञाचा घोडा वाल्मीकींच्या आश्रमाजवळ आला. आश्रमांत अध्ययन करणाऱ्या ब्राह्मणांच्या मुलांना तो घोडा ओळखतां आला नाहीं. त्यांनीं घोडा कुठून पाहिलेला असणार ! घोडा हें शहरी लोकांचें वाहन. त्यामुळें आपापसांत वर्णन करतांना म्हणतात कीं:—"पश्चात्पुच्छं वहति विपुलम्" असा तो प्राणी कोणता बरें असेल ? परंतु लव क्षत्रिय होता. 'वितरति गुरुः प्राज्ञे विद्यां यथैव तथा जडे'।—गुरु सर्वांना सारखी विद्या देतात, पण एकाला शंभर मार्कस् मिळतात आणि दुसऱ्याला शून्य मार्क मिळतो. वाल्मीकींनीं सर्वांना सारखें शिकविलें होतें, परंतु सर्वांनीं आपापल्या बुद्धीप्रमाणें ग्रहण केलें. लवानें पुस्तकांत वाचलें होतें. तो क्षत्रिय होता. तो ब्राह्मणांना म्हणाला, "तुम्हीं या प्राण्याला कसा ओळखूं शकणार ! दूर व्हा. हाच अश्वमेधयज्ञाचा घोडा आहे." त्यानें घोड्याच्या मस्तका-वरील लेख वाचलें आणि मनांत म्हणाला कीं, "क्षत्रिय जात जगांतून खलास झाली काय ! जगांत मी क्षत्रिय आहें असें म्हणणारा कोणी नाहीं का ?" लवानें घोड्याला पकडलें व त्याला आश्रमाच्या आवारांत घेऊन गेला. ब्राह्मणाचीं मुलें खेळायला सजविलेलें चांगलें खेळणें मिळालें म्हणून अगदीं खुष झालीं होतीं. परंतु इतक्यांत पाठीमागून शस्त्रधारी सैनिकांना धांवत येतांना पाहिलें. ब्राह्मणाचीं मुलें शस्त्रधारी सैनिकांना पाहून घाबरलीं. ब्राह्मणांच्या मुलांना लढायला थोडेंच येतें ! लवाला सांगतात, आम्ही पळून जातों, "आम्ही पळून जातों, तूं पण पळ." लव पळण्याकरितां जन्मलेला नाहीं. तो एकटा उभा राहिला.

लवानें घोड्याचा कान पकडून त्याला बांधलें. सैनिकांनी त्याची कडक शब्दात इजेरी घेतली, परंतु त्यानें त्यांना मुळींच जुमानलें नाहीं. त्यावेळीं त्याला समजाविण्या साठीं सैनिक म्हणाले, 'हा पोरकटपणा काय? राम कुठे आणि तूं कुठें?' लव म्हणतो, "बोलताना कांहीं विचार आहे कीं नाही? रामाविषयीं आदर तर आहे. अगोदर माहित असतें तर घोड्याला पकडलें नसतें, परंतु तुम्हांला येताना पाहिलें. आता घोडा सोडणार नाही." नंतर त्यांच्यांत युद्ध झालें, परंतु लवापुढें त्यांचें कांहींहि चाललें नाहीं. म्हणून लक्ष्मणाचा मुलगा चंद्रकेतु आणि सुमंत्र पुढें आले. चंद्रकेतु अत्यंत लहान असलेला योद्धा होता. दोघेहि समवयस्क होते. Today the age of Chivalry has gone" चंद्रकेतु सुमंत्राला सांगतो, "माझ्यासारखाच हा आहे असें वाटतें. सुमंत्रा! त्याला रथ दे. मी रथावरून लढणार आणि हा जमिनीवरून लढणार हें बरोबर नव्हे." तो म्हणतो, "हा रथ घे आणि त्यांत बसून लढ." लव म्हणतो, "तुझा रथ तुझ्याजवळ राहूं द्या. तुझ्या सौजन्यांत सर्व आलें, मला आनंद झाला. परंतु आम्ही जंगलवासी आहोंत." सुमंत्र म्हणतो, 'कोणत्या प्रकारचा मुलगा आहे पहा!' चंद्रकेतु म्हणतो, "रामानें जर याला पाहिलें असतें, तर त्याला किती बरें आनंद झाला असता!" लव म्हणतो, 'राम सज्जन आहे असें मी ऐकलें आहे, परंतु त्याचे नोकर अशा प्रकारची राक्षसी वाणी कां बरें उच्चारतात? तुमचे सैनिक असें बोलले म्हणून घोडा पकडलेला आहे, नाहीं तर सोडून दिला असता. मला राज्य थोडेंच करावयाचें आहे?' सुमंत्र म्हणतो, आमच्या सैनिकाची निश्चित चूक आहे. त्यांचा पराभव हा तुझें शौर्य दाखवितो. परंतु परशुरामाचा पराभव करणारा राम आहे, म्हणून घोडा सोडून दे.' लव शांतपणें म्हणतो, "रामाची स्तुति कसली करता? परशुरामाचा पराभव केला यांत काय केलें?

"परशुराम शस्त्रग्राही ब्राह्मण होता." चंद्रकेतु हें एकून चिडतो. तो म्हणतो, "हा कोणी नवा पुरुषाचा अवतार आहे असें वाटतें. रामाच्या चरित्राची सुद्धां याला माहिती नाहीं—'पुण्यानि तातचरितान्यपि यो न वेद।' राम याच्या कांहीं खिजगणतींत दिसत नाहीं." दोघेहि लढाईला सुरवात करतात.

नंतर राम येतो. लवाकडे पाहून राम खुष होतो. मुलाला पाहिल्यानंतर त्याच्याकडे त्याचें चित्त आकृष्ट होतें. शुद्ध प्रेमाला बाह्य वस्तूचें आकर्षण नसतें, आंतील आकर्षण असतें. रामाच्यावेळीं फोटो काढणारे ( Photographers ) नव्हते. त्यामुळें रामाच्या भावनांचा फोटो निघू शकला नाहीं. चंद्रकेतु म्हणतो, 'काका आलेले आहेत.' लव म्हणतो, "तुला तर चार काका आहेत." चंद्रकेतूच्या तोंडून रामाचें नांव ऐकून म्हणतो कीं, "प्राचेतसाचा शिष्य लव तुम्हांला नमस्कार करीत आहे." 'प्राचेतसान्तवासी लवोऽभिवादयते।' वडिलांचें नांव माहीत नसल्यामुळें लव असें म्हणतो. इतक्यांत

कुशही येतो. एकटा भाऊ लढत आहे, म्हणून स्वतः धनुष्याचा टणत्कार करीत येतो. रामला हें पाहून आनंद होतो.

भारतीय संस्कृतींतील तरुण कसे असावेत त्याचा हे दोघे आदर्श आहेत. मुलगा नव्हे परंतु जगांतील वीररस ज्याच्यांत एकवटलेला आहे ती मूर्ति येत आहे. जगाकडे तृणासारखे पाहाणारे त्याचे डोळे आहेत, पृथ्वीला खालीं नेणारीं तो पावलें टाकीत आहे, असें असूनही ज्याच्या ठिकाणीं हिमालयासारखी धीरता आहे, राम म्हणतो कीं साक्षात् वीररस येत आहे.

**दृष्टिस्तृणीकृतजगत्त्रयसत्त्वसारा धीरोद्धता नमयतीव गतिर्धरित्रीम् ।**
**कौमारकेऽपि गिरिवद्गुरुतां दधानो वीरो रसः किमयमेत्युत दर्प एव ॥**

असे भारतीय तरुण असावयास पाहिजेत. क्षुद्र, भित्रे, स्वार्थी, भोगलंपट तरुण असतील तर तें कसलें राष्ट्र ? कोणाची उन्नति ? आम्ही कपडे काढून जेवायला बसत नाहीं, कारण छाती दाखवतांना आम्हाला लाज वाटते. हा तरुण कसला ? आकाशाला बांधणारा आणि हिमालयाचें चूर्ण करण्याची दुर्दम्य आशा बाळगणारा म्हणजे तरुण.

आज वीस वर्षांचा तरुण जणू कांहीं सर्व झालें आहे असा वागतो. वाल्मीकींनीं नंतर राम व लव-कुश यांची भेट करविली आहे. लव-कुशांनीं वडिलांच्या कीर्तीला शोभेल असें वर्तन केलें आहे.

रामायण हा भारताचा सांस्कृतिक ग्रंथ आहे. लोकांना मार्गदर्शन होण्यासाठी हा ग्रंथ लिहिला आहे. रामायणाच्या या चरित्राच्या 'आकर्षणा' मुळें नंतर अठरा संस्कृत रामायणें लिहिलीं गेलीं आहेत. प्राकृत भाषेंत किती असतील ? तें कोणाला माहीत ! इतर सर्व रामायणें चांगलीं आणि वाचण्यासारखीं आहेत, परंतु त्या सर्वांना मूलभूत ऐतिहासिक आणि प्रमाणभूत रामायण हें केवळ वाल्मीकिरामायणच आहे.

रामाचें वर्णन म्हणजे आदर्श पुरुषाचें वर्णन. भगवान् व्हायचें असेल त्याला अगोदर रामासारखें आदर्श बनविलें पाहिजे. कर्तव्य आणि पौरुष यांचें प्रतीक म्हणजे राम. असें जिथें नसेल तिथें राम नाहीं, असें आपण प्राकृत भाषेंत म्हणतो. रामायण भारतीय संस्कृतींतील उत्तोत्तम व्यक्ति कोणत्या त्यांचें आविष्करण वाल्मीकींनीं केलें आहे. भारतीय संस्कृति जगांत काय फेरफार करूं इच्छिते तें रामायण वाचल्यानंतर कळेल. अधःपतित, दुर्बळ आणि भोगलंपट झालेल्या भारतीयांना तर रामायण मार्गदर्शन करीलच, परंतु संपूर्ण जगाची उन्नति करण्याची शक्ति रामायणांत आहे. वाल्मीकींनीं दाखविलेलें जीवन जगण्यासाठी गुण आत्मसात् करून ते प्रत्यक्षांत आणूं. तें यंत्रयुग, कलियुग किंवा शाप नाहीं तर वरदरूप होईल. रामकाळांतील समाजव्यवस्था आत्मसात् करा. त्यावेळचें जीवनचित्रण म्हणजे समाजाच्या प्रगतीचें प्रतिबिंब—समाजाचें उत्कृष्ट वर्णन म्हणजे रामकालीन समाजव्यवस्था.

रामायणात रामकालीन प्रजेचें दिव्य वर्णन वाचल्यानंतर असें वाटेल कीं, विचारांचा सुवर्णकलश रामकालीन लोक होते. हें वाल्मीकींचें वर्णन वाचलें आणि त्याच्याचबरोबर आजच्या मानवी जीवनाचें चरित्रचित्रण करणाऱ्या लेनिनचें ' स्टेट ऑफ रेव्होल्यूशन ' मधील ' Higher phase of Communism ' वाचलें तर त्यांतही अशी कल्पना पाहायला मिळते. दोघांची दृष्टि एकच आहे. रामायणकालीन समाज अशा तऱ्हेचा उच्च आदर्शरूप होता. असा समाज व्हायला हजारों वर्षें लागतील.

कर्तव्यपरायणता म्हणजे राम, परंतु रामाचे ठिकाणीं केवळ कर्तव्यपरायणता नव्हती. कर्तव्यपरायणतेबरोबर निर्लोभीपणा पण होता. म्हणून लोक केवळ कर्तव्यपरायणच नव्हते, तर त्याच्याचबरोबर रामासारखे लोभविवर्जितहि होते. लोभविवर्जितता कशी येईल हें एक समाजशास्त्रांतलें कोडें आहे. कोणालाहि तें उलगडत नाहीं. पैशाची वाटेल तेवढी विभागणी करा, परंतु लोभ जोपर्यंत गेला नाहीं तोंपर्यंत संघर्ष राहाणार. रामकालीन समाजानें आपल्याला असें राहायला शिकविलें आहे. खरोखर ! त्याकाळच्या मानव वंशाचे आपण ऋणी आहोंत. केवढी मेहनत घेतल्यानतर त्यांनीं अशा तऱ्हेचा समाज निर्माण केला असेल ! त्याकाळच्या लोकाना विसरलों तर आपण कृतघ्न ठरूं. मानव्याच्या पूर्णावस्थेचा प्रगाढ परिचय रामायणांत करून देण्यांत आलेला आहे. ज्याला पूर्णावस्थेची घाई लागली असेल त्यानें रामायणांतील समाजव्यवस्थेचें वर्णन जरूर वाचावें. राम विश्वात्मवादी आहे, स्वतःचीं सुखदुःखें विश्वाशीं एकरूप केलेलीं आहेत. रावण म्हणजे व्यक्तिवाद—मी आणि माझीं सुखें. राम म्हणजे विश्वात्मवाद—मी आहें, त्याचप्रमाणें जगांत दुसरेहि आहेत. मला खायचें आहे त्याचप्रमाणें इतरांनाहि खायचें आहे. मला न्याय हवा त्याचप्रमाणें माझ्या बांधवांनाहि न्याय मिळाला पाहिजे. अशा तऱ्हेनें विश्वात्मवादी दुसऱ्यांचे विकार आणि विचार यांचाहि विचार करतो. रावण म्हणजे मी आणि माझे उपभोग. बिभीषणाशीं पटत नाहीं तर त्यानें खुशाल निघून जावें. व्यक्तिवाद अतिशय नैसर्गिक आहे; मी आणि माझें. आईच्या मांडीवर बसलेल्या लहान मुलाला कांहीं खाऊ मिळाला तर आईला न देतां खाऊन टाकतें. विश्वात्मवाद संस्कारांनी येत असतो. त्याकरिता प्रयत्न आणि पुरुषार्थ याची आवश्यकता आहे. रावण मेहनतीशिवाय होऊं शकतो, परंतु राम व्हायला मेहनतीची गरज आहे. व्यक्तिवाद धांवत येत आहे त्यावेळीं राम कसें व्हायचें तें रामायण शिकवितें.

व्यक्तिवादी लोकांचा मीपणा कुठपर्यंत ? मी आणि माझें कुटुंब ही भावना सुद्धां त्यांच्यांत नसते. कुटुंबाची गोष्ट तर बाजूलाच राहो, परंतु पत्नी सुद्धां मी नाहीं, सुख देईल तोंपर्यंत पत्नी, नाहीं तर घटस्फोट. माझा भाऊ म्हणजे पण मी नाहीं. मी हा व्यक्तिवाद ठिकठिकाणीं नाचत आहे. असें असतांना रामकालीन मानवांनी काय

केलें होतें ? वसिष्ठ, विश्वामित्र यांनीं केवढे परिश्रम घेऊन संस्कार केले होते ? म्हणून व्यक्तिवाद दूर करायला संस्कारांचीच गरज आहे. ते संस्कार वैदिक वाङ्मयांत उडी मारल्याशिवाय मिळणार नाहींत. म्हणून 'अहम्' जाण्यासाठीं मेहनत करा, बुद्धि घासा. असें कराल तरच व्यक्तिवाद नाहींसा होईल. नाहीं तर बाप आणि मुलगा यांचेंही पटणार नाहीं. मुलगा म्हणतो कीं वृद्ध वडील खटखट करतात म्हणून वृद्ध लोकांची गरज नाही, त्यांना पांजरापोळांत सोडून द्या, नाहीं तर वांद्याच्या कत्तलखान्यांत पाठवा. मी म्हणजे सहा फूट व्यक्ति, दुसरें कांहीं मानायला मी तयार नाहीं, मग काय ?

म्हणून वैदिक वाङ्मयांत उडी मारून त्यांतील तत्वें आत्मसात करा, स्वाध्याय करून वैदिक जगाला विश्वात्मवादी बनविण्याची आवश्यकता आहे. स्वतः तो विश्वात्मवाद आचरणांत आणूनच दुसऱ्याला सांगायला पाहिजे. रामायणाचें हेंच महत्त्व आहे. विशिष्ट प्रकारचें Hammering करून मानवाला विश्वात्मवादी बनविण्यासाठीं विश्वामित्र वगैरे ऋषींनीं रक्ताचें पाणी केलें होतें. त्याच्या प्रयत्नाचें नवनीत म्हणजे रामराज्य होय. रामायण ऐकून पुण्य मिळतें असें समजाल तर रामायण लिहिणाऱ्या लेखकाचा हेतूच नष्ट होईल. लोभविवर्जित होणें हा त्याचा हेतु आहे, त्याचबरोबर कर्तव्यपरायणता सुद्धां यायला पाहिजे, आणि लोकोत्तर गुण जीवनांत प्रत्यक्ष व्हायला पाहिजेत. त्यासाठीं जीवन समर्पित करा. अशा तऱ्हेचे मानव्याचे संस्कार करा. व्यक्तिवाद जन्मापासूनच येतो. रावण होण्यासाठीं संस्काराची जरूर नाहीं. राम होण्यासाठीं संस्कारांची आवश्यकता आहे. जगात अशा तऱ्हेची व्यवस्था कुठेंही पहायला मिळणार नाहीं. रामायणांतील कर्तव्यपरायण लोभविवर्जित आणि लोकोत्तर गुणसंपन्न विलोभनीय मानवचरित्रें पाहूनच आपलें मस्तक आदरभावानें नम्र होतें.

अशा तऱ्हेचा आदर्श समाजवाद, दिव्य लोकोत्तर जीवन, तसेंच अशा तऱ्हेचे भव्य आणि उदात्त विचार जर आत्मसात् करणार नाहीं तर काय करणार ? मोठे मोठे राजकारणी लोक याकरितां डोकीं फोडीत आहेत, कोणत्याही 'Ism' मुळें शुद्ध रामव्यवस्था येणार नाहीं. निर्विकार आणि शुद्ध व्यवस्था रामकालीनच होती, जी रामायणांत दाखविली आहे. अर्थशास्त्रांतल्या सर्व प्रश्नांचा चलगडा रामकालीन लोकानीं केलेला आहे. समाजव्यवस्थेंत वर्णसंकर होऊं नये आणि गर्भविग्रह होऊं नये म्हणून लोकाचे प्रयत्न होते अशा तऱ्हेचा तो लोकोत्तर बुद्धिशाली उत्कृष्ट काळ होता, त्या काळच्या विचारांत दिव्यता आहे. पण आपलें दुर्दैव कीं, आज आपलेच लोक त्याला हीन लेखण्याचा प्रयत्न करीत आहेत. लोकानीं कितीही नक्करी करावी, परंतु इथें अद्वितीय संस्कार करण्याची वृत्ति आहे.

पाठशाळेंत उपनिषद् वाचण्याकरितां जातों, असें सांगाल त्यावेळीं रावणी वृत्तीचे लोक तुम्हाला कमी लेखतील, त्याच्यात अठराव्या शतकातील गोष्टी आहेत,

'ॐ...हूँ...' असें म्हणून तिरस्कार करतील, असें ऐकल्यानंतर कारलें खाल्ल्यासारखें तोंड कराल! आणि सर्व गप्पा आहेत असें शेवटीं म्हणाल. त्यांना सांगायला पाहिजे कीं, तुमच्या डोक्यांतही येणार नाहीं अशी मोठी वैचारिक उडी रामायणानें मारलेली आहे. त्यांत अंधश्रद्धाळू लोकांच्या गोष्टी नाहींत. भौतिकवाद वाटेल तेवढी गर्जना करो, पण त्याच्याशिवाय चालणारच नाहीं.

अध्यात्म टिकवणाऱ्याला Offensive व्हावें लागेल. अध्यात्मवादी दुबळा राहिला तर रावणी वृत्तीच्या लोकांची संख्या वाढणार. मोठे शब्द उच्चारूं नकोस. ताकद असेल तर बस, विचार कर. शास्त्रांचा पुर्ण अभ्यास करून बोलायचें असेल तर बोल. अध्यात्मवादी जर दुर्बळ राहिले तर ज्याप्रमाणें जनस्थान आणि पंचवटी यांत राक्षस वाढले होते, त्याप्रमाणें घरोघरीं राक्षस वाढतील. प्रत्येक त्यांच्या कानांत चोंच मारील. आजचे अध्यात्मवादी ईश्वरावर पुर्ण विश्वास ठेवून बसलेले आहेत. काय वसिष्ठ आणि विश्वामित्र अकलशून्य होते! आणि छगनलाल आणि फोगटलाल शहाणे आहेत! वसिष्ठ ६०००० विद्यार्थींना आश्रमांत ठेवीत असत. त्यांचा काय ईश्वरावर विश्वास नव्हता! आळशासाठीं भगवान् नाहीं. अशा तऱ्हेच्या आळशी लोकांना कान पकडून बाहेर लाथ मारून हांकलून द्यायला पाहिजे. त्यांना माहीत नाहीं की रात्रंदिवस कर्मयोग करणारा भगवान् आहे. आपण इथें झोंपतों त्यावेळीं दुसऱ्या अर्धगोलांत प्रकाश कोण पाडतो! एक क्षणही विश्रांति किंवा आराम घेतल्याशिवाय ईश्वराचें कार्य सतत चालू आहे. मोठा त्रिपुंड्र लावला म्हणजे भक्त होत नाहीं. रात्रंदिवस कर्मयोग करणारा मुलगा आळशी राहिला तर तो मुलगा नाहीं, म्हणून पशुतेला लाथ मारून मानवतेला वांचवायची असेल तर 'Offensive' होण्याचे दिवस आलेले आहेत. रामचरित्र वाचल्यानंतर आमच्यामध्यें कर्तृत्व आणि पौरुष जर येणार नाहीं, तर आमच्यांत राम नाहीं असें नक्की समजावें. रामायणाच्या योगानें एवढा बौद्धिक विकास व्हायला पाहिजे कीं, 'Defeat us in arguments.' असें सांगण्याची ताकद यावी. आधिभौतिक आणि आध्यात्मिक, व्यक्तिवाद, पशुता आणि मानवता यांची लढाई बरोबर चालू आहे.


आकाशाचा आकार कसा आहे! आकाशासारखा. राम व रावण यांच्या युद्धाला उपमा राम व रावण यांच्या युद्धाचीच. परंतु आपण हें विसरतों कीं 'अणुबॉंब'ची लढाई सर्व ठिकाणीं चालत नाहीं. रामायणाची लढाई तर घराघरांत चालू आहे; नेहमीं चालते. मानवता आणि पशुता, आध्यात्मिक आणि आधिभौतिक, विश्वासवाद

आणि व्यक्तिवाद यांची लढाई रोज चालू आहे. या लढाईत तुम्हीं कोणाचा पक्ष घेणार ! रामाचा कीं रावणाचा ? मानवतेचा कीं पशुतेचा ? लढायचें तर आहेच. कंबर कसुन काम करावें लागेल. Ceremonial मनुष्य काय उपयोगी ! एका ठिकाणीं सर्व एकत्रित होऊन स्वाध्याय करूं. जर स्वाध्यायानें असा समाज तयार होत असेल तर स्वाध्याय करण्याची प्रतिज्ञा करूं या. लोकोत्तर समाज तयार करणें, ही एकच गोष्ट, एकच विचार, आणि तो एकाच सतरंजीवर बसून स्वाध्याय केल्यामुळेंच निर्माण होणार आहे. हें आजच्या काळांतही छाती उंच करून सांगतां येईल.

---

## जनतेचें आरोग्य म्हणजेच राष्ट्राचें सामर्थ्य

**राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठीं बलवान व्हा.** यासाठीं नियमित व्यायाम आणि खेळ खेळणें जरूर आहे. यासाठीं लागणारी उपकरणें म्हणजे डंबेल्स, लेझीम...यासारखा सर्वश्रेष्ठ माल आम्ही बनवितो. नगरपालिका, जिल्हा परिषदा, ग्रामपंचायती, व्यायाम शाळा, विकास केंद्रे याना माल पुरवितो.



**लक्ष्मीविजय वुडन आर्टिकल वर्क्स** ८५ बापू खोटे स्ट्रीट, आंबली मोहोल्ला, मुंबई ३

प्रोप्रायटर—डी. एच्. सावरकर

# साईसदया

भेदील भवाला । जिंकील काळाला ॥
अशी तुझी माया । साईसदया ॥ धृ० ॥
अनादी अनंत । तूचि भगवंत ॥
जळो अंतरात । तुझी भक्तिज्योत ॥ १ ॥
देव तू भक्तांचा । प्रभु या जगाचा ।
कृष्ण द्वारकेचा । तू विठू पंढरीचा ॥ २ ॥
बंध हे फुकाचे । दंभ वासनेचे ॥
वेड मला लागे । तुझ्या भक्तिचें ॥ ३ ॥
तूच माझें धन । तुझेंच हें मन ॥
हेचि देई दान । झिजो तुझ्यासाठीं तन ॥ ४ ॥
जन्म हा मिळाला । आणि धन्य झाला ॥
तूच रे गोपाला । मुक्ति दे जिवाला ॥ ५ ॥

# जा ! शरण साईला—

सोड अभिमान प्राण्या, जा शरण साईला ।
येई संकटकाळीं धावूनिया तो तुझ्या हाकेला ॥ १ ॥
करील जो साईभक्ति; नाहीं त्याला कसली भीति ।
नित्य त्याचा पाठीराखा; दिली बाबांनी पावती ॥ २ ॥
असो दीन वा अनाथ । पापी किंवा तो पतित ।
करी रक्षण तो त्याचें; निश्चयानें साईनाथ ॥ ३ ॥
असा थोर महिमा ज्याचा; जगिं गाजला ।
धरी पाय त्याचे, नको शंका तुजला ॥ ४ ॥
आजवरी जे सांगून गेले साधूसंत थोर ।
नाम तुझें जगिं आहे साई मोठे मशहूर ॥ ५ ॥
सोड अभिमान प्राण्या जा शरण साईला ।
येई संकटकाळीं धावूनिया तो तुझ्या हांकेला ॥ ६ ॥

कवि : बा. भा. मगदूम

# श्रद्धा व सबुरी

***************

लेखक : श्री. बा. भा. मगदूम

हा श्रीसाईबाबांचा महान् दुहेरी मंत्र आहे. नाण्याला जशा दोन बाजू असतात, तद्वत हा मानवी संसार द्विविध स्वरूपाचा आहे. सुख, दुःख, स्त्री, पुरुष तसेच माता, पिता, बहीण, भाऊ इ. नाती द्विविध आहेत; भक्त व परमेश्वर हे नातेंहि बाह्यतः द्विविधच आहे. ज्याप्रमाणें दुःखानें मानव बेजार होतो. तसेच त्याला सुखहि पेलत नाहीं. यासाठीं जीवननिष्ठा असावी लागते, ही निष्ठा श्रद्धेतून प्राप्त करतां येते, व दुःखाच्या परिहारासाठीं 'सबूरीची' कास धरावी लागते. हा भक्तिमार्गीतील उत्क्रांतिवाद आहे. जीवन संघर्षमय आहे. हा संघर्ष जर 'श्रद्धा व सबूरीच्या,' नियमानी युक्त नसेल, तर त्याला ओंगळ व हिडीस स्वरूप प्राप्त होईल. केवळ जन्म-गुणावर जसा मानव श्रेष्ठपदी आरूढ होऊ शकत नाहीं, त्याला कर्मगुणाची जोड असावी लागते, या दोन्ही गुणांचा परितोष व उत्कर्ष साधण्यासाठीं बाबांनीं या दुहेरी मंत्राचा उपदेश भक्तांना दिला.

बाह्य संसार व जग हे कृत्रिमतेच्या मायेनें भरले आहे. मानवी व्यवहारांतील 'भल्याबुऱ्याची जाणीव, नाहींशी होत चालली आहे. स्वार्थापरता धर्म नाहीं—हा आजच्या जगाचा युगमंत्र झाला आहे. मग परमार्थाची गोष्ट तर दूरच राहिली, पण ही दांभिकतेची, व स्वार्थाची वाट अंधारातून जाणारी आहे. या काळोखांत न दिसणारे खड्डे निश्चित धोका निर्माण करतात. हा धोका टाळण्यासाठीं 'श्रद्धा व सबुरीचा' प्रकाशमय दीप बाबांनी आपल्या हातीं दिला आहे. या प्रकाशानें आपली भीति नाहींशी होऊन आपण निर्भय होणें हें आपलें कर्तव्य आहे. आचार व विचार यांच्यांत सुसंगति निर्माण करणारी ही दैवी देणगी आहे. या बहुमोल देणगीचा वापर आपण जितक्या कुशलतेनें व आत्मियतेनें करूं तितके चांगलें यश आपल्या पदरीं पडेल. अन्यथा 'घरीं कामधेनू पुढें ताक मागे' अशी अवस्था बहुनेकांची असते. सत्याला आधार देणारा व असत्याचा नाश करणारा हा मंत्र आहे. गतीचे सद्गतीत रूपांतर करण्याची किमया या मंत्रांत आहे. बाबासारख्या त्रिकालदर्शी महात्म्यानें मानव जातीला दिलेला हा बहुमोल सल्ला आहे. हा केवळ दांभिक धर्म प्रचार नसून अनुभवानें खात्री करून घेण्याचा प्रयत्नवादी उपाय आहे. 'आधी केलें मग सांगितलें' अशी प्रत्ययवादी साधना आहे. जड व सूक्ष्म मृतावस्थेला जिवंत करणारी ही संजीवनी आहे.

श्रद्धा व सबूरी, हे दुधारी शस्त्र आहे, यासाठीं याचा वापर कुशलतेनें केला पाहिजे, हा जीवनयोग ' योगः कर्मसु कौशलम्। या रीतीनें आचरिला जावा; ', इच्छा, भय, क्रोध हे त्रिदोष, ' श्रद्धा व सबूरींच्या यज्ञात हवन केले तरच स्वानंद-सुखाचे यज्ञफल आपणास मिळूं शकेल. ' श्रद्धा व सबूरी ही षड्रसांची मेजवानी नसून देहधारणेसाठीं नित्य उपयोगी, पडणारी ' भाजी-भाकरी आहे ' शापादपि शरादपि। असे श्रेष्ठ सामर्थ्य या दोन शब्दात भरले आहे. याच्या चिंतनानें विकार-वषता नाहीशीं होऊन, सात्विक सामर्थ्याचा लाभ होतो. मानसिक धैर्य निर्माण होते, यासाठीच ' धैर्य तो देव जाणावा। ' असे समर्थ वचन आहे. ज्याप्रमाणें गुन्हा, शासन व कायदा हीं त्रिविध सामाजिक उपाययोजना आहे, त्याप्रमाणें मानव, श्रद्धा व सबूरी ही भक्तिमार्गातील त्रिविध उपचारपद्धति आहे. सद्बुद्धि व दुर्बुद्धि हीं बाह्यतः आभा-सात्मक रूपें आहेत. ती उपाधिस्वरूप आहेत, व त्यापासून निर्माण होणाऱ्या सुखदुःखादि भावनाही उपाधिस्वरूप आहेत.

सामान्य माणसांचे मन नेहमींच ब्रह्मानंदाच्या श्रेष्ठ स्थितींत राहूं शकत नाहीं. ' श्रद्धा आणि सबूरी ' हा जीवनाचा जमाखर्च आहे. हा जमाखर्च आपण जितक्या चांगल्या रीतीनें करू त्याप्रमाणांत आपला ताळेबंद सुधारत जाईल। अखेरची शिल्लक अधिक अचूक येण्यास मदत होईल. ' श्रद्धा व सबूरीची,' टांगती तलवार सदोदित आपल्या नजरेसमोर राहिली तर ' चित्ताची ' अखंड सावधनता आपोआप निर्माण होते व हा सावधपणा उत्कर्षाला आवश्यक असतो. ज्याला खरी जीवनोन्नती साधायची आहे, त्याला मला काय त्याचे असे म्हणून चालणार नाहीं. दैवाची गहनगती जरी आपणास कळली नाहीं, तरी कर्मांची सहजगती आपण समजूं शकतो. हा आचारधर्म कळकळीनें व जाणीवेनें आचारतां येण्यासाठीं ' श्रद्धा आणि सबुरीची गरज आहे.' बाबांच्या अमर व श्रेष्ठ श्रद्धेनें पाण्याच्या पणत्या पेटल्या, ही श्रद्धेची ज्योत कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत प्रत्येकाच्या ठाईं असते. या ज्योतीला सबूरीची जोड दिल्यास त्याचा प्रकाश मंगलमय व अविनाशी बनतो, बाबांचे हे दोन शब्द चंद्र, सूर्यासारखे आहेत. मानवानें आपल्या दुर्भाग्य नाशासाठीं व दुर्गती टाळण्यासाठीं यांचा उपयोग करावा. बाबांची भक्ति याच मार्गानें आपण करूं शकतो. आपण या मार्गानें चालू लागलो तर बाबांची कृपा सदैव आपल्या पाठीशी उभी आहे, अखिल मानवजातीचे मार्गदर्शन व तारण करण्याचें सामर्थ्य श्रद्धा व सबूरी या दोन महामंत्रांत सांठले आहे.

# महापुरुष ब्रह्मेंद्र स्वामी धावडशीकर

लेखक : श्री. नारायण त्र्यंबक जवारकर, धुळें

या महापुरुषाचे जन्मस्थान वऱ्हाड प्रांतामध्यें श्रीगणपतीचे राजुरी नजीक दुधेवाडी म्हणून एक लहान खेडें आहे ते होय. तेथें महादेव भट, दुधेवाडी व राजुरी ह्या गांवीं भिक्षुकी करून आपला चरितार्थ चालवीत. यांच्या पत्नीचें नांव "उमाबाई" असें होतें. बरेच दिवस यांस संतती नव्हती. साठावे वर्षी एक पुत्ररत्न झालें. त्याचें नाव विष्णु असें ठेविलें. सन १६४९ मधें जन्म झाला. आई-वडिलांनीं भिक्षाटण करून द्रव्य संपादन करून मुलाचें मौजीबंधन केलें. वडिलांजवळ वेदाभ्यास करून ते गत झाल्यावर राजूरी येथें अनुष्ठान सुरूं केलें. एक तप निस्सिम भक्ती केली. मंगलमूर्ति प्रसन्न होऊन सर्वसामान्य महापुरुष-तुला जन म्हणतील असें वरदान दिलें. विष्णूस परमानंद होऊन काशी क्षेत्रीं जाऊन १६६३चे सुमारास शानेंद्र सरस्वती नामे एका विद्वान तपोनिधीचा अनुग्रह घेऊन परमहंस दिक्षा घेतली. गुरुनीं ब्रह्मेंद्रस्वामी असे नामाभिधान दिलें. गुरुंची उपासना करून ब्रह्मज्ञान प्राप्त करून घेतलें. नंतर उत्तर मानस व दक्षिण मानस तीर्थयात्रा केल्या. बद्रिनारायणापर्यंत जाऊन परत वाराणशीस आले. पुन्हा यात्रेनिमित्त फिरत फिरत सातार प्रांतीं आले व गुप्त रूपानें राहून देशस्थिती अवलोकन केली. कोंकणप्रांतीं चिपळूणजवळ मौजे पेठे गावी परशुरामाचें प्राचीन रम्य संस्थान आहे. तेथें जवळच एका गुफेंत तपश्चर्या सुरूं केली. प्रथम बाळा गोळी याचे दृष्टीस पडलें. तो नित्य त्यांस कंदमुळें अर्पण करी. गोमूत्र प्राशनास आणून देई. केळीचे पानावर बसून ते खाडीपार परशुरामाचे दर्शनास जात. हें पाहून बाळागोळी व बाळाजी विश्वनाथ मनोभावें त्यांची सेवा करीत. बाळाजी विश्वनाथ यास श्री गजानन व भार्गव तुला महत्पद प्राप्त करून देतील असा आशिर्वाद दिला. श्री परशुराम क्षेत्रीं भार्गवाचें प्राचीन मंदीर आहे त्याचा जीर्णोद्धार केला. शाहू महाराज दिल्लीहून सुटून आले त्यांस राज्यारूढ होशील सांगितलें. ते राज्यावर बसलेवर त्यानीं स्वामीस गुरू मानून त्यांची सेवा केली. ब्रह्मेंद्र स्वामीचे आग्रहावरून बाळाजी विश्वनाथ यांस पेशवेपद दिलें. जंजिऱ्याचा हबशी सिद्धिकासम हा १७०७ मध्यें मरण पावला. त्याचे गादीवर याकूबखान बसला. तो हिंदु द्वेष्टा नव्हता. त्यानें स्वामींचें दर्शन घेतलें पेठे आंबडस गांवें देवस्थानास इनाम करून घेतलें. तेथें बापूजीपंत तांबे यांस देखरेख करण्यास ठेवलें. त्यांनीं समर्थ रामदास स्वामीप्रमाणें अलिप्त राहून राजकारण चालविले. त्याचेवर छत्रपतीची

व प्रमुख सरदारांची निष्ठा बसली. बाळाजी विश्वनाथ यास स्वामी द्रव्यद्वारा मदत करीत बाळाजी १७२० रोजीं सासवड मुक्कामी मृत्यू पावले. नंतर त्यांचे पुत्र बाजीराव यास पेशवेपद मिळाले. स्वामींनीं शाहूमहाराजास मुद्दाम भेटून हे कार्य पार पाडले. घावडची गांव स्वामींस १७२० वा या वर्षी इनाम मिळाले. देवाचे भिक्षेच्या निमित्तानें द्रव्य जमा करीत. सरदाराचे काम सिद्धीस गेले कीं ते स्वामीस द्रव्य देत, पेशव्याकडे लाखो रुपये कर्ज होते. बाजीराव व शाहूमहाराज याची स्वामीवर पूर्ण निष्ठा होती. मराठा राज्याचे उत्कर्षास यांचे फार साह्य झालें. मराठी राज्यात जेवढे म्हणून थोर पुरुष झाले त्यास उदयास आणण्यास कोणीतरी सत्पुरुष कारणीभूत झालेले आहेत. चिंचवडचे मोरया गोसावी, निगडीकर रंगनाथस्वामी, ब्रह्मांडचे आनंद मूर्ती, वडगांवचे जयरामस्वामी इत्यादि सत्पुरुष मराठी वीरांचे गुरु होते.

स्वामी ब्रह्मेंद्र स्वामी महाराज शके १६६० श्रावण महिन्यांत मुखातून रामनाम चालू असताना प्राणोत्क्रमण झाले. त्यांचे समाधी स्थानांवर दिव्य देवालय बांधून त्याचे चिरस्मारक केलें. स्वामींचे समाधीस शतशः प्रणाम करून हे अल्पचरित्र संपवितो.



दिव्य दृष्टीसाठीं TELIGRAM :— DIVYANETRA

**शिसा ऑप्टिशिअन्स** (BOM. DADAR)



[ चष्म्यांचे व्यापारी ]

यांच्या येथें तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून

उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतील

छबिलदास रोड, दादर (W. R.),

# ' वासनामय जगत् '

लेखक : श्री. केशव कृष्ण प्रधान

**मनुष्याच्या मनाचा वासना हा स्थायीभाव आहे. वासना नसल्या तर मन नाहीं व मन नसते तर वासनाही नसत्या. म्हणून कधीकधी मनालाच दुसरे नांव वासना हे द्यावे असे वाटते. आपल्या सबंध आयुष्यांत आपण कधी वासना केली नाहीं, असा एकही क्षण आपल्याला दाखविता येणार नाहीं. वासना मनांत फारच थैमान घालूं लागल्या म्हणजे त्यांचे अस्तित्व आपल्याला जाणवते. इतरवेळीं त्या मनांत नसतात असें मुळींच नाहीं. फक्त त्या गुप्त अवस्थेत असतात, एवढेच.**

मनुष्याच्या वासना जर काढून घेतल्या तर त्याच्या जीवनांतील गोडीच नाहींशी होईल व मग त्यानें जगावयाचे तरी कशाला ? मनुष्य केवळ वासनापूर्तीकरितांच जगत असतो. नाहींतर त्याला जगण्याचे कांहींएक प्रयोजन नाहीं. आपण वासनांना गोड नावे देऊन चांगली वासना, वाईट वासना, किंबहुना वासना शब्द टाकून त्या ठिकाणीं चांगला शब्द इच्छा असा वापरतो. परंतु मला असें वाटते कीं, वासना शब्दाचा अर्थ वाईट इच्छा असाच आपण कां करावा ? इच्छा म्हणा, वासना म्हणा या सर्वांचा अर्थ आपली मनापासून आवड. वासना म्हणजे तात्पुरती इच्छा असें म्हटले तर इच्छाही बराच काळ टिकणारी वासना असें म्हणावे लागेल. एवढाच काय तो या दोघामध्ये फरक आहे. बाकी दोन्ही मनांपासून असलेल्या आवडीच. आपली कुठलीही मनांपासून असलेली आवड पुरी व्हावी असें कोणाला वाटत नाहीं ? सर्वांनाच वाटतें आणि ते वाटणें हे अगदी बरोबर आहे. ज्यांच्या पूर्ततेमुळें आपल्या मनाला पूर्णपणें समाधान आणि सुख लाभेल, अशा आपल्या इच्छा एकत्रीत केल्यास त्या त्या सर्वांची गोळाबेरीज आपल्या दृष्टीने, आपलें जीवन पूर्णपणें सौख्यमय करण्यांत होईल असें आपल्याला सहाजिकच वाटते व तसें जीवन जगण्याचा आपण सतत प्रयत्न, नव्हे अट्टाहास करीत असतों. श्रीसमर्थांच्या उक्ती-प्रमाणें ' जगीं सर्व सुखी असा कोण आहे ' या प्रश्नाचे उत्तर कोणीही, हमखास मी आहे असें देऊ शकत नाहीं. हेच खरोखर सर्व दुःखांचे मूळ कारण आहे. इच्छा

हा जर मनाचा स्थायीभाव आहे तर त्या पुन्या करण्यासाठीं सारखे घडपडणें ही मनांची नैसर्गिकच क्रिया असणार. व मनांत उद्‌भवलेल्या त्या त्या वेळचा त्या त्या वासना भोंवतीं मन आपल्या विचारांनी, कल्पनानी पिंगा घालणार त्यांत नवल ते काय ?

## बऱ्यावाईट इच्छा

मनांच्या या नैसर्गिक क्रियेंत तारतम्य बुद्धी वापरून अतीम सुखासाठीं कोणत्या इच्छा चांगल्या व कोणत्या वाईट याविषयीं नीति तत्वे एकसारखी आपणास घडे देत असतात. आमचे वेदांती तर आम्हांस मुळांत इच्छाच मारून टाका म्हणजे तुम्ही एका निर्वाच्य, निरामय, अमर आणि अखंड अशा ब्रह्मानंदाचे घनी व्हाल असें आमीष सतत दाखवितात. जगातील सर्व धर्म आम्हाला इच्छेमध्यें चांगली इच्छा व वाईट इच्छा असे दोन भाग करून, वाईट इच्छेपासून दूर राहण्यास बजावतात. किंबहुना आम्ही त्यांच्या दृष्टीनें चांगल्या इच्छा करून चांगले विचार, चांगल्या कल्पना करूं लागलो, म्हणजेच आम्ही खरेखुरे धार्मिक झालो आहोत असें त्यांस वाटते.

मला वाटतें अशा तऱ्हेनें चांगल्या इच्छा बाळगणें, चांगले सुसंस्कृत विचार करणें वगैरे गोष्टी मनुष्याला जवळ जवळ दुष्प्राप्य आहेत. ज्यांना समाज वाईट म्हणतो अशा इच्छा मनामध्यें न येणें हें कांहीं दोरीवरची सर्कस करण्याइतकें सोपें नाहीं. चारचौघांनीं आपल्याला बरें म्हणावें याच भावनेनें मनुष्य आपल्या वाईट म्हटल्या गेलेल्या इच्छांना काबूत ठेवण्याचा प्रयत्न करतो व त्या प्रयत्नांत कमी अधिक यशस्वीहि होतो. परंतु याचा अर्थ हा नव्हे की, अशा तऱ्हेच्या सर्वच इच्छावर तो पूर्णपणें विजय मिळवूं शकला आहे. माणसाचे हे अपयश माझ्या दृष्टीनें अगदीं स्वाभाविक असेंच आहे, एवढेंच खरे कीं आपण चार–चौघांमध्यें आपल्या मनातील वाईट इच्छा बोलून दाखवीत नाहीं. कधींकधीं आपल्या मनांत वाईट इच्छा असतांना सुद्धां आपल्यांत त्यांचा अभाव आहे, असें उगीचच आपणांस वाटत असते. नीट लक्ष लावून पाहिल्यास त्या सतत तेथें वास्तव्य करीत असतात.

## इच्छा हाच परमेश्वर

माझ्या दृष्टीनें इच्छा हाच परमेश्वर आहे. अगदीं मूर्तिमंत परमेश्वर आहे, व म्हणूनच त्यांत वाईट किंवा चागला असा कुठलाहि सापेक्षीय भाग नाहीं. मूळांत इच्छा हेंच चैतन्य, हीच मूळशक्ति. ती जगांत जे जे काहीं दिसते व त्यातील जे जे कांहीं आवडते त्या त्या कडे स्वबलानें घाव घेणारच. त्यातच चैतन्याचे चैतन्यपण, व जीवंतपण आहे. मूळ आनंद जो आपल्याला हवा हवासा वाटतो व जो इच्छापूर्ती-

साठीं इच्छेच्या स्वरूपानें आपल्या मनाचा स्थायीभाव असतो तोच मुळांत अमर आहे. तेव्हां दुसऱ्या अर्थानें इच्छाशक्ती हीच अमर झाली. ती मारता येणें म्हणजे आपल्यामधील परमेश्वराचा अमर अंश नाहींसा करण्याचें असाध्य काम करण्यासारखें आहे. तेव्हा आमचा सर्व धर्मग्रथाचा व वेदांताचा इच्छाच नष्ट करा हा अट्टाहास मूळांतच चुकीचा आहे. त्या ऐवजी आपल्यामधील वारंवार निर्माण होणाऱ्या इच्छाना खरोखरी काय पाहिजे आहे याचाच नुसता विचार न करिता जे पाहिजे ते मिळाल्यावर आपण अपेक्षिलेले सुख खरोखर आपणास त्या इच्छ पूर्तीतून मिळाले काय याचाहि विचार आपण केला पाहिजे. ते जर मिळाले नसेल तर ती इच्छा किंवा वासना एकवेळ पुरी झाल्यानंतर जो सुखाचा अनुभव आला तोच सुखाचा अनुभव ती इच्छा अगर वासना दहावेळां पुरी होऊन सुद्धा जवळ जवळ तसाच येणार. दर खेपेला विशेष असा फरक होणार नाहीं, व त्यापासुन मिळालेले सुख एक वेळेला जेवढे मिळाले तेवढेच व तसेंच दाही वेळेला सुद्धा मिळणार. फरक झाला तरी तो कळण्या न कळण्या इतकाच होणार. एवढे समजूनसुद्धा मनुष्य त्याच इच्छा पुन्हा पुन्हा पुऱ्या करण्याचा प्रयत्न का करतो ? याचे कारण असें आहे की, मनुष्य या दृष्टीकोनांतून इच्छापूर्तीपासून झालेल्या आनंदाकडे पहात नाहीं. वरील दृष्टीकोनातून त्या इच्छापूर्तीचा विचार करीत नाहीं, हे एक कारण झालें. दुसरे कारण त्याची इच्छापूर्तीपासून होणाऱ्या सुखाची अपेक्षा खरोखरी किती आहे तेच त्याला स्वतःला कळत नाहीं. रोजचे नीरस जीवन, जें चालले आहे त्यापेक्षां थोडेफार निराळे केवळ रुचिपालटासारखे कांहीतरी करावे असें वाटल्यावरून तो पुष्कळवेळा कांहींतरी करीत असतो. म्हणून त्यास इच्छापूर्तीनंतर विशेष फरक जाणवत नाहीं. मनापासून असलेली आवडसुद्धां मनःस्थिति योग्य असल्यावरच, पुरी होण्यांत आनंद आहे. इतरवेळी पुरी झाल्यास त्या पूर्ततेंत विशेष आनंद वाटत नाही.

## आमची भ्रामक समजूत

मनुष्यानें जर आपणास खरोखर किती आनंद पाहिजे आहे याची नीटशी कल्पना करण्याचें ठरविलें तर त्याला असें कळून येईल कीं आनंदाला पार नाहीं. आणि म्हणूनच कोणतीही ऐहिक इच्छा अगदीं पूर्ण झाली तरी तो आनंद मिळाल्यासारखा वाटत नाहीं. शिवाय मूळ आनंद हा मुक्त व विषयरहित असल्यामुळें तो विषयसापेक्षेत कोणत्याही विषयापासुन झाला आहे असें निष्कारण समजून आपणच त्याचें मूळ स्वरूप मर्यादित करतो. विषय उपभोगाशिवाय आनंद मिळणार नाहीं असें समजून आपण विषयोपभोगाच्या वस्तूंच्या मागें त्यापासूनच आनंद मिळतो असें खोट्या तऱ्हेनें समजून मागें लागतो. थोडक्यांत साध्यासाठीं लागणाऱ्या साधनांचा विनाकारण अवलंब आपण करतो. विषयापासून आनंद होतो ह्या भ्रामक समजुतीमुळें विषयवस्तू मुळांतच नष्ट झाली अगर तीं प्राप्त

होण्याची शक्यता दुरावली की आपणास अपरीमित दुःख होते हा मानवी जीवनाचा इतिहास आहे. म्हणून प्रत्येक सजीव अथवा निर्जिव वस्तूच्या म्हणजेच विषयाच्या उपभोगानंतर त्या वस्तूपासून खरोखरीच जे सुख उपभोगिले त्या सुखानें आपले पूर्ण समाधान झाले अथवा नाहीं ह्याबद्दल आपण आपल्यालाच विचारले पाहिजे. जर खरोखरच समाधान झाले असेल तर आपण पुन्हा त्याच वस्तूच्या मागे लागून ते समाधान मिळविण्याचा प्रयत्न करू; परंतु आपला अनुभव असा आहे की, कोणतीही वस्तू अगर विषय; उपभोगानंतर आपणास पुर्णपणें समाधान देऊंच शकत नाहींत. पुन्हा पुन्हा समाधान मिळण्यासाठीं त्याच वस्तूचा अगर विषयाचा जो अवलंब आपण पुन्हा पुन्हा करतो तो केवळ प्रथम मिळालेले समाधान अपुरे, अपूर्ण वाटते म्हणूनच, पूर्ण समाधान झालें म्हणून नाहीं. म्हणूनच मानवी जीवन हे आपणास अपूर्ण वाटते. पूर्ण समाधान देणारें वाटत नाहीं. पूर्ण समाधान मिळविण्याची इच्छा म्हणजेच मूळ इच्छाशक्ति. म्हणजेच मूळ आवड. तिची शक्त इतकी जबरदस्त मोठी व दांडगी आहे कीं ती मानवी मनाला झंझावातासारखे हेलकावे देऊन त्यांस जगांतील सव विषयाच्या मागें लावून आपली पूर्तता करण्यास भाग पाडीत आहे. अर्थात ही पूर्तता कोणत्याही ऐहिक विषयापासून पुरी होऊं शकतच नाहीं, हें मानवाच्या आतांपर्यंतच्या अनुभवावरून पुरेपुर सिद्ध झालें आहे. तेव्हां सहाजिकच हें पुरेपूर समाधान त्याला कोणत्याही विषयावर अवलंबून राहून कधींहि मिळणार नाहीं, हें सूर्यप्रकाशाएवढें सत्य आहे. तेव्हां हें समाधान मिळविण्यासाठीं त्याला कुठल्यातरी निर्विषय स्थितीचा अवलंब करावा लागेल. तो आज नाहीं तर उद्यां.

## दुःखांतून सुटण्याचा राजमार्ग

विषयांचें ह्या जगांतील अस्तित्व माणसाला अतिशय उपयुक्त असें आहे व त्याचा उपभोग घेणें हें तर त्याहूनही जास्त महत्त्वाचें आहे. तो जर घेतला नाहीं तर माणसाला आपल्याला पाहिजे असलेल्या खऱ्याखुऱ्या आवडीची म्हणजे मूळ शक्तीची कल्पनाच येणार नाहीं. ती खरीखुरी कल्पना येण्यासाठीं विषय उपभोगाचा आनंद व निर्विषय आनंद स्थिती याचा तुलनात्मक अभ्यास करतां आला पाहिजे व त्याचें ज्ञान झाले पाहिजे, परंतु माणूस विषयांच्या मागें लागल्यावर त्यांच्या निमित्तानें मर्यादित होणाऱ्या, परतु वस्तुतः अमर्यादित असलेल्या आनंदाला पूर्ण आनंद समजून त्याच त्याच विषयाच्या मागें हात धुऊन लागतो, व विषयाच्या असाध्यतेमुळें किंवा विनाशामुळें दुःखी होतो. हेंच जगांतील सुख अगर दुःख. यांवर उपाय 'वासना सोडा' हा खचित नव्हे. वासना जे कांहीं पुर्तीसुख देतात ते पूर्ण सुख असते की अपूर्ण असते याविषयीं परीपूर्ण विचार करणें हाच या दुःखांतून सुटण्याचा राजमार्ग आहे.

ह्यावर आमचे धर्मग्रंथ असें म्हणतात कीं, वासनांना जर मोकळया सोडल्या तर त्या फोफावतात. अगदी अग्नीमध्यें तूप टाकल्यानंतर ज्वाला फाफावतात तशा काबूत रहात नाहींत. मला वाटते कीं, त्या काबूंन ठेवण्याच्या प्रयत्नाचे हे दुष्परीणा आहेत. कांहीं धर्मगुरू म्हणतात की वासनांची पूर्ती पूर्ण सुख देत नाही. 'हें कळ पण वळत नाहीं.' मला वाटते कीं, वासनापूर्तीपासून होणारा आनंद केव वासनाच्या अवलंबनामुळें मर्यादित होतो, हा विचारच कोणी कधीं करत नाहीं. ज एखाद्यानें केलाच तरी त्याला पूर्ण आनंद मिळावा ह्याविषयीं फार तीव्र इच्छ झालेली नसते. ज्या ठिकाणीं अपूर्ण आनदा निषयी पुरेपूर विचार व पूर्ण आनद मिळविण्यासाठीं तीव्र इच्छा ह्या दोघाचा संगम झाला आहे त्या ठिकाणी वरील अपेक्षाना जागाच रहाणार नाहीं.

## तूंच माझी आवड

जे कृष्णमूर्ती तर असें म्हणतात कीं, 'Answer to desire is desire itself.' त्याचें म्हणणे असें आहे कीं, इच्छेच्या विचाराच्या उगमाकडे नुसते नीट मनानें पाहिल्यानेसुद्धां इच्छा निर्विषय होते व ती अमक्याबद्दल आहे, अमूक विषयापासून पुरी होईल असें वाटते त्या इच्छेचे ते विशेषत्वाचे आवरण उडून जाते. हीच निर्विषय वासना. हीच मूळ संविद्–स्फूर्ति–मूळ आवड. Creativity un known God इच्छा मारणे हा त्यावरील उपाय नाहीं.

आमच्या सर्व संतानी परमेश्वराला 'तुझी माझी आवडी तुचि सर्वस्वाची जोडी,' 'हेचि माझे सर्व सुख' अशा संबोधनानें आळविले आहे. मूळ आवड मानवात एकच असून विषयाना निमीत्त करून ती मूळ आवड पुरी करावयाचा अट्टाहास युगेनुयुगे चालू आहे. विषयापासून मिळणारे सुख खरोखर विषयांत नसून, मूळ आवडीतच ती आवड आहे, किंवा मूळ सुखातच ते सुख आहे, हे समजण्यासाठीं या ब्रह्मांडाची निर्मिती आहे. मानवाची अंतीम आवड ही विषयाच्या आवडापेक्षां वेगळी नसून तीच ती आहे. फक्त त्यामधील विषयाच्या अवलंबनाची मर्यादा टाकून दिली पाहिजे. हे अनेकदा जर आपल्याला समजले तर वैराग्यांतील तीव्रता आपोआप नाहींशी होते व विषया विषयींचा अनुराग परमेश्वराच्या अनुरागाकडे सहज वळतो. हेच अंतिम सत्य आहे. या संबंधीनें एका कवीनें लिहिलेला अभंग येथें द्यावासा वाटतो.

कारे तुझी ऐशी थोरची ती गाती । इच्छेच्या परती पांडुरंगा ॥
पूरविली इच्छा, जे जे मनी येते । प्रेमाचे भरते मजलागी ॥
लडीवाळ बाळ मागतो ते देशी । इच्छेच्या परती तेव्हा कैसा ॥
आता कळो आले लबाड तू देव । तुझी माझी ठेव कळावे हे ॥
याजसाठीं तुझी सारी धडपड । अंतीम निवड इच्छेची तू ॥
तूचि माझी इच्छा, तुचि ती आवडी । सर्वस्वाची जोडी पांडुरंगा ॥

# ईश्वर प्राप्तीचा मार्ग

— गुरुदेव डॉ. रानडे

आत्मप्राप्ती मार्गाचें दिग्दर्शन करणें हा सर्व संतांचा अतिशय जिव्हाळ्याचा विषय होय. श्रीज्ञानेश्वरांनीं या मार्गाचें अनेक दृष्टींनीं वर्णन करण्यासाठी आपली पराकाष्ठा केली आहे. "हा पंथराज अगदीं शेवटपर्यंत कोणीच पांथस्थ चालून जाऊं शकत नाहीं." असें श्रीज्ञानेश्वरांचें म्हणणे आहे. सर्वांत मोठे देव श्रीशंकरहि अद्यापि या मार्गावरील प्रवासीच आहेत. योग्याचे समुदाय आकाशीं या मार्गानें आडवे-तिडवे निघाले व ते गेलेली वाटच अनुभवाच्या पावलामुळें रहदारीचा रस्ता बनली. त्यांनीं बाकीचे आडमार्ग सोडून सरळ आत्मज्ञानाचा राजरस्ता स्वीकारला. त्यानंतर मोठमोठे ऋषी त्यांच्या मागून गेले. प्रथम साधक होते ते हा मार्ग चोखाळून सिद्ध झाले. हा मार्ग पाहतांच साधक तहानभूक विसरतो. या मार्गांत रात्र-दिवस हा भेद राहात नाहीं. या मार्गावर चालत असतां पाऊल पडेल तेथें मोक्षाची खाण सहज उघडते. तेथें कोणी आडमार्गास लागला तरी स्वर्ग लाभतो; सरळ पूर्वेकडून निघाला कीं थेट पश्चिमेस जातो. याप्रमाणें या मार्गावरील प्रवास निश्चळ व निश्चित आहे. या मार्गानें चालूं लागलें असतां आपणांस जें गांव गांठावयाचें आहे तें गाव आपणच होतों, हा या मार्गाचा आश्चर्यकारक विशेष आहे."

## २. पंथराजाच्या चार वृक्षराजी.

भगवद्गीतेस अनुसरून श्रीज्ञानेश्वरांनीं या पंथराजाच्या चार वृक्षराजी असल्याचें वर्णन दिलें आहे. "सांख्य-दर्शनाचा अवलंब करून कांहीं साधक ज्ञानमार्गानें जातात व 'विचार'—मुशींत छत्तीस तत्त्वें टाकून शेवटीं बावनकशी शुद्ध आत्मसुवर्ण काढून घेतात; कांहीं जण ध्यानाच्या साह्यानें आपल्यामध्येंच आत्म्यास पाहतात, तर कांहीं जण कर्माच्या आश्रयानें ईश्वरप्राप्ति करून घेण्याचा प्रयत्न करतात. शेवटीं, कांहीं जण आपला अभिमान टाकून दुसऱ्यावर पूर्णपणें विश्वास ठेवतात व त्या विश्वासाच्या जोरावर संसाराच्या अज्ञान-तिमिराचा नाश करतात. ते हिताहित जाणतात व दुसऱ्याचें दुःख पाहून त्याचें अंतःकरण दयेनें भरून येतें. ते त्यांचें दुःख निवारतात व त्यांना सुख देतात. विश्वास ठेवलेल्या गुरुजनांच्या मुखांतून जे शब्द येतात ते हे साधक फार आदरानें ऐकतात, ऐकून मनानें व शरीरानें तसें वागण्याचा प्रयत्न करतात व त्या शब्दांवरून आपले जीवन ओंवाळून टाकतात. हे साधक देखील शेवटीं उत्तम प्रकारें संसारसमुद्र तरून

जातात. ज्ञानयोग, ध्यानयोग व कर्मयोग यांच्या इतकाच भक्तियोग श्रेष्ठ मानला असून, श्रेष्ठ सद्गुरूच्या उपदेशाप्रमाणें जो वागतो, त्यास इतर मार्गांवरील क्लेश सहन करावे न लागतां, सहज आत्मज्ञान प्राप्त होतें, असें येथें सांगितलें आहे.

## ३. सर्व आपत्तींत ईश्वराचा शोध

जन्म दुःखमय असल्यामुळें मनुष्यावर कितीहि संकटें कोसळलीं, तरी त्यांतून ईश्वर–प्राप्तीचा मार्ग त्यानें काढावा. वस्तुतः ईश्वराचा शोध केल्यानेंच या जीवनांतील दुःखें नाहींशी होतील. " शेंकडों छिद्रें पडलेल्या नावेंत बसून माणसास निश्चिती कशी मिळेल ? शस्त्राचा वर्षाव होत असतां उघडें कसें राहावें ? रोगग्रस्त मनुष्य औषधाविषयीं उदास कसा राहील ? चोहोंकडे वणवा पेटला तर तेथून मनुष्य कसा पळून जाणार नाहीं ? त्याप्रमाणें या दुःखमय जगांत आल्यावर मला न भजून कसें चालेल ? मनुष्यप्राणी माझें भजन करत नाहींत तें कोणत्या आधारावर ? त्यांच्या अंगीं असें काय बळ असतें कीं ते आपल्या घरीं किंवा भोगांत निश्चित राहूं शकतील ? त्यांची विद्या किंवा त्यांचें वय यांची काय किंमत आहे ? मला न भजतां त्यांना सुख कसें लाभणार ? आयुष्य म्हणजे मृत्युलोकींचा शेवटचा बाजार आहे व येथें आपत्तींचा अनेकविध माल आला असून तो मृत्यूच्या मापीं लागला आहे. येथें गिऱ्हाइकांस सुख कसें मिळेल ? गार राखुंडी फुंकून दिवा लागेल काय ? विषाचे कांदे वाटून व त्या रसास 'अमृत' असें नांव देऊन तो रस प्याल्यानें कोणी अमर होईल काय ? त्याप्रमाणें या दुःखमय आयुष्यापासून कोणासहि सुख प्राप्त होणें शक्य नाहीं. या मृत्युलोकीं सुखाची कहाणी कोणीं ऐकिली आहे काय ? इंगळाच्या अंथरुणावर सुखाची झोंप येईल काय ? या मृत्युलोकींचा चंद्र देखील क्षयरोगी आहे व येथें तारेहि मावळण्यासाठीं उगवतात. येथें मंगलाच्या अंकुरास अमंगळाची कीड लागते; उदरांतील गर्भास देखील मृत्यु कोंडतो. जे गेले त्यांच्या मार्गावरील पावलें पाहिलीं, तर परत आल्याची एकहि खूण दिसत नाहीं. येथील पुराण व इतिहास म्हणजे गेलेल्यांच्या एकत्र केलेल्या गोष्टी ! अशा मृत्युलोकांत लोकांनीं निश्चित राहावें हें फार आश्चर्यकारक होय ! बाळ जसजसें वाढूं लागतें, तसतसे हे आनंदानें नाचतात; परंतु वस्तुतः तें मृत्यूकडे ओढलें जातें याची यांना खंतच वाटत नाहीं ! जन्मल्यावर एकेक दिवस मनुष्य प्राणी मृत्यूच्या जवळ जवळ जात असतो हें ते विसरतात व उल्हासानें गुढ्या उभारतात ! " मरण " हा शब्द सुद्धां त्यांना सहन होत नाहीं आणि कोणी मेला तर त्याच्यासाठीं हे रडतात. परंतु जें आहे तें नष्ट होणार हें मूर्खपणामुळें यांना उमजत नाहीं. साप बेडकास गिळत असतां बेडूक माशा धरूं पाहतो, त्याप्रमाणें कोणत्या लोभानें हे लोक रोज तृष्णा वाढवितात हें कळत नाहीं ! अरेरे ! अर्जुना, तूं जरी दुर्दैवानें या वाईट मृत्युलोकांत जन्मला आहेस, तरी झडझडून बाहेर नीघ व भक्तीच्या मार्गास लाग, म्हणजे तूं माझ्याशीं सायुज्यता पावशील. "

### ४. दृढ भावनेनें ईश्वरप्राप्ति.

मानसशास्त्रदृष्ट्या कोणतीहि तीव्र भावना ईश्वराकडे घेऊन जाऊं शकते असें दिसतें. याप्रमाणें अत्यंत तीव्र प्रेम, भीति किंवा द्वेष यापैकीं कोणत्याहि भावनेच्या साह्यानें परमेश्वर–प्राप्ति होते, असें श्रीज्ञानेश्वरांनीं सांगितलें आहे; "गोपाच्या स्त्रियांनीं 'वल्लभ' म्हणून माझें ध्यान केलें व त्या स्वरूपांत त्या मला येऊन मिळाल्या. कंसाला माझी भयंकर भीति वाटली, तरी तो शेवटीं मला येऊन मिळाला. शिशुपालानें माझा अतिशय द्वेष केला, तरी तो माझ्याशीं एकरूप झालाच ! यादवांनीं बंधु व आप्त म्हणून माझ्यावर प्रेम केलें, वसुदेवानें पुत्र म्हणून माझ्यावर माया केली, नारद, ध्रुव, अक्रूर शुक व सनत्कुमार यांच्या भक्तीचा मी श्रेष्ठ विषय होऊन राहिलों व ते सर्व माझ्या स्वरूपांत लीन झाले. अर्जुना, मीच सर्व भावाचें अंतिम ध्येय आहे व मला भक्ति, वैषयिक प्रेम, वैराग्य, द्वेष इत्यादि अनेक मार्गांनीं येऊन मिळतां येतें." (ज्ञा., ९, ४६५–७०.) देवाविषयीं प्रथम कोणतीहि भावना ठेवली तरी शेवटीं ती तीव्र होताच ध्येयाशीं म्हणजे परमात्म्याशीं एकरूप होते, हाच वरील विवेचनाचा मतितार्थ आहे.

### ५. दुराचाऱ्यासहि आशा


ज्यानीं आपलें आयुष्य अत्यंत अधमपणांत व पापकर्मांत घालविलें आहे, त्यांना सुद्धां उत्तम प्रकारचें समाधान तसेंच आश्वासन मिळेल असें श्रीज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे. "पतितानाहि सुधारण्याची आशा ठेवली आहे. दुराचारी लोकाच्या अंगीं देखील त्यानीं फक्त परमेश्वराविषयीं भक्ति बाळगली तर ईश्वरास जाऊन मिळण्याची योग्यता येते. पापी व पतितदेखील साधू होऊं शकतात व होतात, असें श्रीज्ञानेश्वरानीं स्पष्टपणें सांगितलें आहे. महासागरात बुडणारा मनुष्य या तीरीच वाचावा, त्याप्रमाणें मनुष्य आधी जरी दुराचारी असला तरी माझ्यावर त्यानें निष्ठा ठेवली तर तो सर्वांत उत्तम पुरुष बनतो. निःसीम भक्तीनें नाश होणार नाहीं असें पापच जगात नाहीं. याप्रमाणें पश्चात्तापाच्या तीर्थांत स्नान करून कोणी सर्वभावानें माझ्या मंदिरांत आला, तर त्यानें सर्व कुळ पवित्र होतें व तो कुलशीलवान् व श्रेष्ठ होतो. जन्मास येऊन त्यानेंच आपलें सार्थक केलें, सर्व शास्त्रें तोच पढला व सर्व तपें त्यानेंच केलीं, अष्टांगयोगाभ्यासहि त्यानेंच केला. माझ्यासाठींच ज्यास अखंड तळमळ लागते, त्यानेंच सर्व कर्में केलीं. मनाचे व बुद्धीचे सर्व व्यवहार एकनिष्ठ भक्तीच्या पेटींत भरून ती पेटी ज्यानें माझ्या स्वाधीन केली, असा भक्त कालांतरानें ईश्वराशी एकरूप होईल असें मानणें चुकीचें होईल; कारण, तो आधींच माझ्यात मिसळून गेलेला असतो. जो अमृतांत राहतो त्यास मृत्यु काय करील ? त्याच्या चित्तापुढें माझें रूप सारखें असतें, म्हणून तो तत्त्वतः माझेंच स्वरूप असतो. दिव्यानें दिवा लावल्यावर आधीं कोणता होता व मग कोणता लावला हा भेदच राहात नाहीं, त्याप्रमाणें तो सर्वस्वानें माझी भक्ति करूं लागल्यावर, तो मीच होऊन राहतो व आम्हामध्यें काहींच भेद उरत नाहीं."

## ६. ईश्वरभक्तींत ना कुळ, ना जात.

ईश्वर–भक्तींत सर्व पापाचा नाश होतो, त्याप्रमाणें तेथें जाति–कुल–भेदाचे विचारहि नाहींसे होतात. "येथें कुळाचें महत्त्व नाहीं. जन्मानें अंत्यज असला तरी चालेल किंवा शरीरानें पशूच्या जन्मास आला तरी हरकत नाहीं. नक्रानें गजेंद्राचा पाय धरल्याबरोबर अत्यंत काकुळतीनें गजेंद्रानें माझें स्मरण केलें, तेव्हा तो मला येऊन मिळाला व त्याचें पशुत्व नष्ट झालें! ज्याचें नाव घेणे म्हणजे पाप, जे अत्यंत अधमाच्या पोटीं जन्मले, जे व्यसनी, दुर्गुणी व दगडासारखे मूढ व मूर्ख आहेत ते जर दृढपणें व सर्वभावानें माझी भक्ति करतील, जर त्यांच्या तोंडीं माझ्याविषयींच्याच गोष्टी निघतील, जर त्यांची दृष्टि माझेंच रूप पाहील, जर त्यांच्या मनात माझ्याविषयींच विचार राहतील, जर त्याचे कान माझ्या कीर्तीशिवाय दुसरें कांहींच ऐकणार नाहींत, माझी सेवा हेंच जर त्यांच्या सर्वांगाचें भूषण बनेल, मीच जर त्यांच्या ज्ञानाचा एकमेव विषय होऊन राहीन, जर त्यांची बुद्धि फक्त मलाच ओळखील, तद्वतच अशा आनंदानें राहणें हेंच जर त्यांचें जीवन बनेल, अन्यथा राहणें जर त्यांना मरणप्राय वाटेल व याप्रमाणें जर आपले सर्व जीवभाव ते माझ्यांत गुंतवितील, तर ते पापयोनींत जन्मलेले असले व त्यांनीं शास्त्राभ्यास केलेला नसला तरी त्यांना माझ्याशीं तोलून पाहशील, तर, अर्जुना! ते माझ्यापेक्षा यत्किंचित्हि कमी भरणार नाहींत, असेंच तुला दिसून येईल! चामड्याच्या ज्या तुकड्यावर राजाज्ञेचीं अक्षरें असतील, त्यायोगें बाजारांत वाटेल तें विकत मिळतें. येथें सोनें किंवा चांदी प्रमाण नसून राजाज्ञाच समर्थ आहे. कारण, राजाज्ञेची मंजुरी मिळाली, तर कातड्याचा तुकडा देखील सोन्याचांदीपेक्षा जास्त मूल्यवान् ठरतो! जर एखाद्याचीं मन व बुद्धि माझ्या प्रेमानें भरून जातील, तर त्यास उत्तमत्व प्राप्त होतें व तोच सर्वांत श्रेष्ठ ठरतो. म्हणून अर्जुना! येथें जाति, कुल व वर्ण निरर्थक असून मद्रूपता म्हणजे माझ्याकडे मन लावणें हेंच एक महत्त्वाचें आहे. म्हणून मनुष्यानें माझ्याकडे वाटेल त्या भावनेनें यावें; तो एकदां येऊन माझ्यात मिसळला, म्हणजे मग बाकी सर्व शून्य व व्यर्थ ठरतें. इतर प्रवाह गंगेंत मिळाले नाहींत, तोंपर्यंतच त्यांना आढा, ओहोळ, प्रवाह अशीं नावें आम्ही देतों; एकदां गंगेंत मिळाल्यावर ते सर्व पूर्ण गंगारूप होतात. लांकडें अग्नींत टाकलीं नाहींत तोंपर्यंत खैर, चंदन इत्यादि भेद त्यांच्यांत करता येतात; एकदा अग्नींत टाकल्यावर ती सर्व एकरूप होतात व त्यांच्यामधील भेद नाहींसे होतात. त्याप्रमाणें भक्त मला मिळाले नाहींत तोंपर्यंतच त्यांच्यात क्षत्रिय, वैश्य, स्त्री व शुद्र इत्यादि भेद राहतात; परंतु, मला येऊन मिळाल्यावर, मीठ सागरात विरून एकरूप होतें त्याप्रमाणें ते माझ्याशीं समरस होऊन जातात."

## ७. भक्तीनेंच ईश्वर-प्राप्ति

श्रीज्ञानेश्वर हेच खरोखर भक्तिमार्गाचे महाराष्ट्रांतील आद्यप्रवर्तक होत व केवळ भक्तीनेंच ईश्वरप्राप्ति होते असे ते सांगतात: "अर्जुना, तेंच तें किती वेळां सांगावयाचें ? माझी जर तुला चाड असेल तर माझी भक्ति कर. कुळाच्या मोठेपणाकडे पाहूं नको; कुलीनपणाचा अभिमान बाळगूं नको; विद्वत्तेची व्यर्थ घमेंड वाहूं नको; रूपाच्या अथवा वयाच्या संपन्नत्वानें फुगून जाऊं नको. एक भाव माझ्या ठिकाणीं नसेल तर हें सर्व व्यर्थ आहे. जळो तें माझ्या भक्तीवांचून असलेलें जीवन ! अरे, या पृथ्वीवर पाषण काय कमी आहेत ? निंबाचें झाड फळांनी भरून आलें तरी कावळ्यांसच सुकाळ होतो. खापरांत वाढून पक्वान्नें चव्हाट्यावर ठेवलीं तर तीं कुत्र्यांसच उपयोगी पडतात ! त्याप्रमाणें भक्तिहीन जिणें म्हणजे संसार-दुःखानीं वाढलेलें ताटच होय ! "वरून कोसळणाऱ्या पावसास पृथ्वीवर पडण्याशिवाय दुसरी गतीच माहीत नसते किंवा अनन्यगतिक गंगा आपली सर्व जलसंपत्ति घेऊन सागराच्या शोधार्थ निघते व त्यास फिरफिरून मिळते, त्याप्रमाणें आपली भावनारूपी सर्व संपत्ति घेऊन माझा खरा भक्त अखंड प्रेमाणें माझ्यांत मिसळून मीच होऊन राहतो. क्षीरसागर ज्याप्रमाणें तीरावर, मध्यें व चोहोंकडे क्षीरमात्र असतो, त्याप्रमाणें भुंगीपासून माझ्यापर्यंत सर्व चराचर विश्वांत भक्तीसाठीं माझ्याशिवाय दुसरा विषयच त्यास दिसत नाहीं व तो जाणत नाहीं." भेदांमध्यें अभेद-दर्शन म्हणजेच खरी भक्ति होय, असें श्रीज्ञानेश्वर सांगतात. हें भक्तीच्या तात्त्विक स्वरूपाचें वर्णन असलें, तरी खऱ्या भक्तास या अद्वैताचा आनंद उपभोगलाच पाहिजे हेंहि तितकेंच सत्य आहे. "जगांत भेद आहेत; परंतु, त्यामुळें ज्ञान भिन्न होत नाहीं. शरीराच्या अवयवात भेद असतात; तरीहि ते सर्व एकाच शरीराचे असतात. लहान-मोठ्या फांद्या एकाच वृक्षावर वाढतात. सूर्याचे किरण अनंत असले तरी सूर्य एकच आहे. त्याप्रमाणें जगांत नानाविध व्यक्ती असल्या, त्यांची अनेक नांवें असलीं व त्यांच्या निरनिराळ्या प्रवृत्ती असल्या, तरी या सर्व भेदामध्यें मीं अभेदत्वानें राहतो हें जाणावें. अथवा या ठिकाणीं जे जे दिसेल तें सर्व माझ्याशिवाय निराळें नाहीं असा बोध भक्तास व्हावा हेंच त्याच्या खऱ्या भक्तीचे लक्षण असून ही अद्वैत-भक्ति सर्व भक्तींहून श्रेष्ठ आहे.



# महाराष्ट्रीय व पाश्चात्य संत

## —गुरुदेव डॉ. रानडे

### १. अनुभूतीचें अनिर्वचनीय स्वरूप

प्रत्यक्ष, तात्कालिक, इंद्रियातीत, अनुभवजन्य ईश्वराचा साक्षात्कार म्हणजेच अनुभूति होय ही एक प्रकारची मनाची प्रवृत्ति आहे. Mysticism या इंग्रजी शब्दाचा खरा अर्थ अनुभुति किंवा ईश्वराचा साक्षात्कार असा आहे. परंतु त्याचा 'अद्‌भुत चमत्कार' किंवा 'अज्ञेय व गूढ शक्ति' किंवा 'गुप्त गोष्टी' असा विपरीत अर्थ सामान्यतः करण्यात येतो, ही दुर्दैवाची गोष्ट होय. शांत व भक्तिपूर्ण अंतःकरणानें केलेलें ईश्वराचें ध्यान, किंवा मानवी मनास संपादन करतां येईल अशी श्रेष्ठ अवस्था असा या शब्दाचा खरा 'उच्च' अर्थ आहे. परंतु त्यावरून मनाची अत्यंत हीन अवस्था व्यक्त व्हावी ही किती चमत्कारिक गोष्ट आहे! हा त्या अर्थाचा केवढा विपर्यास आहे! ईश्वरी साक्षात्कार ( Mysticism ) म्हणजे स्तब्धपणें ईश्वरांत रममाण व लीन होणें. म्हणून अनुभुतीचें किंवा आध्यात्मिक अनुभवाचें वर्णन करतां येत नाहीं. तो अनिर्वचनीय असतो. प्लेटोची कांहीं विस्तृत व विश्वसनीय पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत. त्यांतील सातव्या पत्रांत तो लिहितो कीं, "या साक्षात्कारावर माझें कोणतेंच लिखाण प्रसिद्ध झालें नाहीं व कधींहि प्रसिद्ध होणार नाहीं. कारण इतर शास्त्राप्रमाणें हा विषय चर्चा करण्यासारखा नाहीं. याविषयीं कांहींहि विस्तृतपणें शब्दांनीं व्यक्त करणें शक्य असतें व तो अनुभव जगास सांगता आला असता, तर त्यानें मानव्याचें अनंत कल्याण झालें असतें; आणि मला त्यापेक्षां लिहिण्यास जास्त प्रिय असा विषयच राहिला नसता व त्यात मला निरतिशय आनंद झाला असता." हें प्लेटोचें म्हणणें अगदीं खरें आहे. अनुभुति इंद्रियापासून मिळणाऱ्या ज्ञानाच्या पलीकडे आहे, हें परमार्थिक अनुभवाचे दुसरें लक्षण होय. अनिर्वचनीयता व इंद्रियातीतपणा हीं दोनहि लक्षणें परस्परावलंबी आहेत व तीं एकमेकांशीं निगडित झालीं आहेत. आध्यात्मिक अनुभवासाठीं एखाद्या स्वतंत्र व निराळ्या इंद्रियाची किंवा आकलनशक्तीची जरुरी नाहीं, असें अनेकदां प्रतिपादण्यांत येतें. बुद्धि, संवेदना व इच्छाशक्ति या त्रयींच्या साहाय्यानें ईश्वराचा पूर्ण साक्षात्कार अनुभवितां येईल. अंतिम सत्याशीं किंवा तत्त्वाशीं एकरूप व्हावें, त्याचा साक्षात्, प्रत्यक्ष व तात्काळ अनुभव घ्यावा, म्हणजेच कोणत्याहि कलेमध्यें,

शास्त्रामध्यें व काव्यामध्यें देखील उच्चतम विचारांची श्रेणी गांठतां येते, हें मत सर्वांना मान्य आहे. आध्यात्मिक अनुभवाविषयीं तर हें जास्त खरें ठरतें. परंतु डीन इजसारखे धर्मशास्त्रकोविद या बाबतींत परस्परविरोधी विधानें करतात, हें पाहून कोणासहि आश्चर्य वाटल्याशिवाय राहाणार नाहीं. 'प्रत्येक मनुष्याच्या मनामध्यें एक प्रकारचा देवाचा अंश असतो. ईश्वराचें ज्ञान मिळवायचें झालें, तर या दैवी शक्तीचा त्यास उपयोग करावा लागतो. प्रत्येकाच्या अंगीं ही शक्ति असते; तरी फारच थोडे लोक तिचा उपयोग करतात. असें डीन इंजनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. तर दुसऱ्या एका ठिकाणीं ते म्हणतात, "सत्याचें ज्ञान मिळवायचें झाल्यास स्वतंत्र व अलग अशा इंद्रियांची आवश्यकता मुळीच नाहीं. साधारणतः अनुभूतीच्या बाबतींत ज्या काहीं लेखकांनीं इंद्रियातीत शक्तीचा पुरस्कार केला असता, तेच लेखक केवळ बुद्धिवादी बनतात व ईश्वरी साक्षात्कारास बुद्धि किंवा चिकित्साशक्ति पुरी आहे, असें प्रतिपादतात. परंतु त्यांचे खरें विचार कोणते हें सहज समजण्यासारखें आहे. ईश्वरी साक्षात्कारास केवळ बुद्धि चालत नाहीं. त्यापेक्षा श्रेष्ठ शक्तीची जरूरी असते, हेंच त्याचें खरें मत होय. ही अतींद्रियशक्ति बुद्धि, भावना व क्रियाशक्तीपासून भिन्न नाहीं. त्या सर्वांत ती ओतप्रोत भरली आहे. व ती या सर्वांचा आधार होऊन राहिली आहे यामुळें बुद्धीवादी लोकांना अनुभूतिशास्त्र पूर्ण चिकित्सात्मक आहे असें सिद्ध करता येईल. परमार्थांत अंतिम तत्त्वाचें सानुभव ज्ञान मिळावयाचें झाल्यास निश्चयात्मक, दीर्घकाल व सतत प्रयत्न करावा लागतो. म्हणून परमार्थांत ( Mysticism ) क्रियाशक्तीचीहि आवश्यकता आहे, हें उघड आहे. खरें आध्यात्मिक जीवन भावनाप्रधान आहे. असें डॉ. डीन इंज म्हणतात व तें अगदीं खरें आहे. परंतु लगेच या विरुद्ध म्हणतात, "परमार्थ जीवनात भावनांना स्थानच नाहीं." त्यांना भावनाबद्दल इतकी का लाज वाटावी हें कळत नाहीं. कारण ते म्हणतात कीं, "परमार्थ किंवा साक्षात्कार म्हणजे देवास अगदीं समोरासमोर पाहाणें. त्यात तीव्र भावनांच्या वृद्धीला स्थान नाहीं." आम्ही डीन साहेबाना असें नम्रपणें सुचवूं इच्छितों कीं, अंतःकरणांतील भावना शुद्ध व पवित्र केल्याखेरीज व त्यांचा देवाच्या सेवेकडे उपयोग केल्याखेरीज, देवास 'समोरासमोर प्रत्यक्ष पाहणें' शक्यच नाहीं. पण याविषयीं तर त्यांचा अट्टाहास आहे! परमार्थ संपादण्याच्या प्रयत्नांत बुद्धि, भावना व क्रियाशक्ति या सर्वांची सारखीच गरज असते. मात्र इंद्रियातीत असलेल्या प्रज्ञानशक्तीचा ( Intuition ) या सर्वांस आधार पाहिजे. अनुभूति अनिर्वचनीय व बुद्धिग्राह्य आहे. परंतु ती अतींद्रिय असल्यामुळें सर्व साधकांचा एक संप्रदाय बनतो; तो इतरापासून अज्ञात व गुप्त राहतो व त्याच्या राहणीचे नियम फक्त त्यानाच तेवढे माहीत असतात; किंबहुना ते त्याना सुद्धां माहीत नसतात; ते परमात्म्यासच ठाऊक असतात, असें म्हणणें योग्य होईल.

## २. महाराष्ट्रीय व पाश्चात्य संतांची तुलना.

याप्रमाणें जगातील सर्व काळच्या व सर्व देशांच्या आत्मज्ञांचा ( Mystics ) एक दैवी व सनातनी समाज बनतो. त्यांना देश काल, जात इत्यादिकांचीं बंधनें मुळींच नसतात. त्यांचा आत्मानुभव दिक्कालातील व अनाद्यनंत असतो. महाराष्ट्रीय संत म्हणजे या दैवी समाजाचा एक अल्पांश आहे. तरी तो संतसभेचा पूर्ण व सर्वतोपरी प्रतिनिधि आहे, असें म्हणण्यास मुळींच हरकत नाहीं. आपण येथें प्रथम महाराष्ट्रीय संत व ख्रिश्चय संत यांची स्थूल मानानें तुलना करूं. त्यांच्यामध्यें दिसणारे समान धर्म कोणते ते पाहूं. नंतर या दोन्ही पौर्वात्य व पाश्चात्य संतांना समान असलेल्या अनुभूतीचा मानसशास्त्र व तत्त्वज्ञानदृष्ट्या सामान्यतः विचार करूं. या ठिकाणीं विवेचन केलेल्या सर्व संतांत अत्यंत श्रेष्ठ संत म्हणजे श्रीज्ञानेश्वर होत. त्यांची प्लॉटिनस्, ऑगस्टिन् व एक्हार्ट् अशा तात्त्विक व महानुभावी पाश्चात्य संतांशीं तुलना करता येईल. कारण त्यांच्यामध्यें बरेंच साम्य आहे. बॅरन् फॉन् ह्यूगेल् नांवाच्या एका ग्रंथकारानें म्हटलें आहे कीं, तत्त्वज्ञान व अनुभूति यांच्यामध्यें संपूर्ण विरोध आहे. ( Eternal Life. P. 85 ) परंतु श्रीज्ञानेश्वर, प्लॉटिनस्, एक्हार्ट व ऑगस्टिन् यांसारख्या महान् श्रेष्ठ संतांच्या बाबतींत तर तत्त्वज्ञान व अनुभूति यांचा मोठा गोड समन्वय दिसतो. तेव्हां बॅरन्-साहेबाचें मत चुकीचें आहे असें आम्हांस वाटतें. श्रीज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी व वरील पाश्चात्य संतांचे "इनियड्," "मिस्टिश," "डी सिव्हिटेट् डायू" इत्यादि ग्रंथ पहा. हे ग्रंथ म्हणजे तत्त्वज्ञान व आत्मज्ञान यांचा मूर्तिमंत गोड मिलाफ नाहीं असें कोण म्हणेल? श्रीज्ञानेश्वर व संत–कवि डान्टे यांची योग्य तुलना करितां येईल, कारण त्या दोघांच्या काव्यामध्यें उच्च प्रकारचें आत्मदर्शन व त्याचा निरतिशय आनंद आहे. तात्त्विक कल्पनांच्या उंच भराऱ्या आहेत व अत्यंत सरस असें काव्य आहे. या गुणांमुळें या दोघा संतकवींचें पूर्ण साम्य आहे. त्यामुळें एकास झांकावें व दुसऱ्यास उघडावें इतकें या दोघांमध्यें साधर्म्य आहे. श्रीज्ञानेश्वरांशीं तुलना करण्यास योग्य असे तिसरे पाश्चात्य संत म्हणजे सेंट् जॉन् ऑफ् दि क्रॉस होय. अध्यात्म–अनुभवाची विविधता व पूर्णत्व व या अनुभवाचें विवरण करण्याची पद्धत या दोन्ही बाबतींत सेंट् जॉन् पाश्चात्य संतवाङ्मयांत अद्वितीय ठरतात. या दोनहि बाबतींत त्यांचें व श्रीज्ञानेश्वरांचें विलक्षण साम्य आहे. स्त्री–आत्मज्ञानान्यांमध्यें चटकन लक्षांत येण्याजोग्या म्हणजे मुक्ताबाई, जनाबाई व कान्होपात्रा या होत यांची तुलना ज्यूलियन् ऑफ् नॉर्विच्, कॅथरिन् ऑफ् सिएना व संत टेरेसा या संत स्त्रियांशीं सहज करतां येण्यासारखी आहे. महाराष्ट्रीय संत–स्त्रिया जास्त अंतर्मुख आहेत; तर मादाम् गियॉन्खेरीज बहुतेक सर्व पाश्चात्य संत–स्त्रिया कर्ममार्गी आहेत, असा त्यांच्या स्वभावात मोठा फरक आहे, ही गोष्ट खरी आहे. शिवाय महाराष्ट्रीय संत–स्त्रियांच्या लिखाणांत कामवासनांच्या उपमांस अगदीं कमी

महत्त्व दिलें आहे, पाश्चात्य स्त्री-संतांच्या वाङ्मयांत या विषयास विशेष प्राधान्य मिळालें आहे. ही गोष्ट निर्विवाद आहे. इकडे हरिजनामध्यें चोखामेळा श्रेष्ठ संत आहे. पाश्चात्य वाङ्मयांत बम् हा चांभार संत प्रसिद्ध आहे. अध्यात्मज्ञान व अनुभव या बाबतींत संत चोखामेळा संत बमूला हार जाणार नाहीं. परंतु विद्वत्ता व तात्त्विक ज्ञानाच्या दृष्टीनें बम् श्रेष्ठ ठरतो. 'सूक्ष्म जग,' 'विरोध' व 'साधर्म्य वाद' इत्यादि त्याच्या तात्त्विक विचारांचा ठसा पाश्चात्य तत्त्वज्ञानावर कायमचा उमटला आहे. सुप्रसिद्ध लॉ, ब्लेक् व संत मार्टिन् हे बम्चे शिष्य होते, ही गोष्ट त्यास भूषणास्पद आहे. श्रीतुकाराम हे एक निराळ्या प्रकारचे महाराष्ट्रीय संत आहेत. यांच्या विचारप्रणालींत व आत्मानुभवांत एक विशेष प्रकारचें व्यक्तिमत्व आहे. या दृष्टीनें त्यांची पाश्चात्य संत सूसो यांशीं योग्य तुलना करतां येईल. कारण या दोन्ही संतांना परमार्थमार्गावर आनंद व भीति प्रतीत झाली, आर्तता व दुःख भोगावे लागलें, ईश्वरी प्रसादाविषयीं त्यांनीं अंतःकरणास पिळवटणाऱ्या भाषेंत देवाची करुणा भाकिली व आक्रोश केला; व शेवटीं त्यांना अवीट आत्मानंदाचा लाभ झाला; या सर्व बाबतींत दोघांचें बरेंच साम्य आहे. श्रीतुकारामांच्या आध्यात्मिक अनुभवाच्या दोन मुख्य पायऱ्या किंवा अवस्था म्हणजे आत्म्याची अंधःकारमय रात्र ( Dark Night of the Soul ) व ही रात्र संपताच मिळालेला ऐक्याचा निरुपम श्रेष्ठ प्रकारचा आनंद. याबद्दल पुढें विस्तृत विवेचन आलेंच आहे. या दोन अवस्थांचें इंग्लिश बनियन् यानें वर्णिलेल्या दोन अवस्थांशीं बरेंच साम्य आहे. त्या म्हणजे आध्यात्मिक यात्रेकरूची परमार्थ मार्गावरील प्रगति ( Pilgrim's progress ) व या अवस्थेंत प्रतीत होणारी देवाच्या दर्शनाची तीव्र मळमळ. या अवस्थेंत अंतःकरणांत मरणप्राय होणाऱ्या वेदना सहन कराव्या लागतात व नरकवासाप्रमाणें आत्यंतिक दुःखें भोगावीं लागतात. या अवस्थेंतून पार पडल्यावर अमाप ईश्वरी कृपा ( Grace abounding ) होते व त्यामुळें दिव्य नवजीवन व त्यांतील अनुपम आनंद प्राप्त होतात. हिंवाळा संपल्यावर येणाऱ्या वसंताप्रमाणें पहिली अवस्था संपताच ही दुसरी आनंदमय स्थिति निश्चितपणें प्राप्त होते. या वेळीं बनियन्च्या ज्ञानचक्षुंस जीजस् ख्राईस्ट देवाच्या उजव्या बाजूस उभा असल्याचें दिव्य दर्शन घडलें! आणखी कांहीं बाबतींत श्रीतुकारामाची युरोपीय संत डायोनिशियस ( एरिओपॅजाईट् ) याच्याशीं तुलना करतां येईल. धाडसी प्रयत्नानें प्राप्त झालेला ब्रह्मानुभव म्हणजे देवाचा, 'दिव्य काळा रंग,' असें आध्यात्मिक आनंदाचें सूक्ष्म पृथक्करणात्मक विवरण त्यानें केलें आहे. या सर्व बाबतींत साम्य असलेलीं उदाहरणें श्रीतुकारामाच्या अभंगांत सापडतील. शेवटीं कर्मयोगी महाराष्ट्र संत श्रीरामदास यांचा तुलना पायथॅगोरस इग्नेशियेस लायोला व, राइसब्रुक या युरोपीय संतांशीं करतां येईल. पायथॅगोरप्रमाणेंच श्रीरामदासांनीं आपल्या शिष्यवर्गाचा एक पंथ स्थापिला व हा पंथ स्थापण्यास त्यांचा राजकीय हेतु होता. त्यामुळे श्रीरामदासांची धार्मिक शिकवणूक राजकीय मतानें रंजित

झाली आहे ही गोष्ट नाकबूल करतां येणार नाहीं. पायथॅगोरसचा आपला पंथ स्थापण्यात राजकीय हेतु स्पष्टच होता. या दोनहि पंथांमध्यें मोठा फरक हा कीं, श्रीरामदासांच्या सम्प्रदायास श्रीशिवाजी राजे यांचा पूर्णतया राजाश्रय व पाठिंबा मिळाला. परंतु आपलें स्वतंत्र राज्य स्थापण्याच्या राजकीय महत्वाकांक्षेमुळें पायथॅगोरियन पंथ धुळीस मिळाला! उलटपक्षीं, श्रीरामदास व संत लायोला या दोघानीं राजकारण व अध्यात्म हीं दोन शास्त्रें एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. श्रीरामदासांच्या शिकवणुकींत या दोहोंचें महत्त्व सारखेंच राहिलें व राजकारणामुळें अध्यात्मास गौणत्व आलें नाहीं. परंतु संत लायोलाच्या बाबतींत राजकारणास इतकें अवास्तव महत्त्व प्राप्त झालें नाहीं. परंतु संत अगदींच गौण ठरलें व पुढें त्याचा मागमूसहि राहिला नाहीं. कर्म व ज्ञान यांचा समन्वय करणाऱ्या श्रीरामदासांच्या दासबोधांत म्हटलें आहे. "काहीं गल्बला, काहीं निवळ ऐसा कंठित जावा काळ" (दासबोध, १९.८.२९). हा उपदेश रॉईसब्रुकच्या शिकवणीशीं अगदीं सुंदर जमतो. "ज्याची दृष्टि अत्यंत अन्तर्मुख झाली आहे, त्यानें आपलें सर्व आयुष्य कर्म व विश्रांति या दोन गोष्टींतच घालवावें. या दोहोंमध्येंच त्यानें पूर्ण व अखंडित रहावें. कारण त्याचें कर्म व ध्यान पुनः पुनः उद्दीपित करण्यास ईश्वर त्यास नेहमीं आदेश देत असतो. वस्तुतः तो देवाच्या हातातील एक जिवंत व उपयुक्त असें साधन बनतो. या साधनाच्या द्वारें ईश्वर आपल्यास वाटेल तें व वाटेल तसें कर्म करवून घेतो. म्हणून ईश्वरेच्छेनें आलेल्या सर्व आपत्ती शांतपणें सोसण्याचें सामर्थ्य व धैर्य त्यास मिळतें व ईश्वराचें ध्यान करण्यास किंवा प्राप्त कर्तव्य करण्यास तो सारखाच तयार असतो."

## ३. आत्मदर्शन

महाराष्ट्रीय संत व पाश्चात्य संत यांच्यामध्यें सामान्यतः किती साम्य आहे याचें येथवर विवेचन झालें. आतां कांहीं उतारे देऊन त्यांची शिकवण कशी एकाच प्रकारची आहे. हें पाहूं. प्रथम आत्मदर्शनाचें वर्णन श्रीज्ञानेश्वर, टॉलर व रॉईसब्रुक यांनीं बहुतेक एकाच भाषेंत केलें आहे. श्रीज्ञानेश्वर सांगतात. कीं, "आत्मज्ञानाच्या खड्गानें भवाश्वत्थाचें वर वाढणारें मूळ छेदून टाकल्यावर आपलें रूप आपणांस पाहावयास मिळतें. परंतु हें आरशांतलें आपलें प्रतिबिंब नव्हे. कारण आरशांतील प्रतिबिंब म्हणजे पाहणाऱ्या मनुष्याचेंच दुसरें रूप होय. आत्म–दर्शन हें जिवंत झऱ्याप्रमाणें आहे. तो झरा विहिरींत लागला नाहीं तरी आपल्यांतच परिपूर्ण असतो. पाणी आटल्यावर प्रतिबिंब मूळ बिंबांत मिळतें. घट फुटला कीं, घटाकाश महदाकाशांत मिळतें. लांकूड जळल्यावर अग्नि मूळ रूपास येतो. त्याप्रमाणें आपण आपलें रूप पहावयाचें असतें. तें न पहातां पहावें व न जाणतां जाणावें. ज्यापासून हें सर्व विश्व निर्माण झालें त्यासच आदिपुरुष म्हणावें. या मूळ पुरुषास पहावें या उद्देशानें

आयुष्याचा तिटकारा येऊन व ध्येय गांठल्या शिवाय पुनः परत यावयाचें नाहीं अशा दृढ निश्चयानें खरे मुमुक्षु योगमार्गानें गेले. त्यांनीं आपला अहंभाव टाकून दिला. आणि ते मूळ घरास आले. जसें थंडीमुळेंच थंडीनें कुडकुडावें, किंवा बर्फानेंच बर्फ बनावें, त्याप्रमाणें ही आत्मवस्तु आपणच आपल्यासाठीं आपल्यांतच राहते. येथें एकदां आल्यावर पुनः परतणें नाहीं. (ज्ञानेश्वरी १५. २६६–८३). आतां संत टॉलर् काय म्हणतात तें पहा : "सर्व प्रकारचीं साधनें करावीं. त्यांच्या साहाय्यानें बाह्य पुरुषाचें (देहाचें) आंतरपुरुषात (आत्म्यांत) पूर्ण रूपांतर करावें. म्हणजे उघडें परब्रह्म अशा शुद्ध जीवाच्या अंतरतम भागामध्यें प्रवेश करतें व आत्मा परमात्म्याशीं पूर्णतया एक बनतो. अशा जीवात्म्यास आपल्या स्वतःस पाहतां आलें तर 'आपण परमात्माच आहो व त्याच्या इतकेंच उदात्त व श्रेष्ठ आहों, असें त्यास दिसतें व पूर्वी होतों त्यापेक्षां हजारों पटीनें श्रेष्ठ बनलों असें त्यास दिसेल" (ट्रीनिटी नंतर १५ व्या रविवारी दिलेलें प्रवचन.) आतां संत रॉइस्ब्रुक् काय म्हणतात तेंहि ऐकू या. "अंतवर्ती दिव्य ज्योतीमुळें हे ध्यानमग्न साधक पूर्णतया बदलून जातात व ज्या ज्योतीच्या साहाय्यानें जी ज्योत ते पाहातात, त्या आत्मज्योतींतच मिळून ते एकरूप होतात. अशा प्रकारें चिरंतन प्रतिमेचें ध्यान करणारे साधक तद्रूपच होऊन राहतात. ईश्वर, सर्व जग व त्यांतील वस्तु सर्व एकरूप असल्याचें ध्यान केल्यानें तें सर्व आत्मज्योतींत सुस्नात झाल्याचें दिव्य दर्शन त्यास घडतें." उपनिषदांतील आत्मदर्शनाची शिकवण अशाच प्रकारची व याच अर्थाची आहे. साधक अनुभूतीचें उच्चतम शिखर गांठतो, तेव्हा "तो आपलें स्वतःचें रूप दिव्य तेजोवलयात तळपत असलेलें आपण पाहतो." यावरून आत्मदर्शन हें अनुभवाचें उच्चतम शिखर कसें आहे व त्याबद्दल विविध काळांतील व देशातील आत्मज्ञांचे स्वानुभवाचे उद्‌गार किती अगदीं सारखेच आहेत हें सहज कळेल.

### ४. आत्मा व देव यांचें ऐक्य.

आतां जीव ब्रह्म एकरूप आहेत यासंबंधीं श्रीज्ञानेश्वर, सेंट् जॉन् ऑफ् दि क्रॉस् व प्लॉटिनस् यांची शिकवण एकच कशी आहे, हें पाहूं. श्रीज्ञानेश्वर म्हणतात, "श्रीकृष्ण व अर्जुन म्हणजेच देव व भक्त, हे समोरासमोर ठेविलेल्या दोन स्वच्छ आरशांप्रमाणें होते. एकाचीं अनंत प्रतिबिंबें दुसऱ्यांत पडत होतीं. अर्जुनानें श्रीकृष्णासह आपणांस श्रीकृष्णामध्यें पाहिलें. श्रीकृष्णानें अर्जुनासह आपणास अर्जुनामध्यें पाहिलें आणि संजयानें त्या दोघांना एकदम एकत्र पाहिलें ! एक आरसा दुसऱ्या आरशापुढें ठेवला तर कोणता आरसा कोणास प्रतिबिंबित करील !" कँटिकल् नामक ग्रंथात सेंट् जॉन् ऑफ् दि क्रॉस सांगतात कीं, आत्मा व परमात्मा प्रेमरज्जूनें इतके घट्ट एकत्र बांधले गेले आहेत व ते इतके एकरूप बनतात कीं, त्यांच्या मूळ रूपांत

पुर्ण फरक पडतो. प्रेमानें ते एकरूप होतात. व एकमेकांत तादात्म्य पावतात. ते वस्तुतः भिन्न असले, तरी बाह्यतः व ऐश्वर्यानें आत्मा देवासारखा दिसतो आणि देव आत्म्यासारखा दिसतो " " तुझ्या सौंदर्यानें माझें इतकें पूर्ण रूपांतर होऊ दे कीं, आपण दोघेहि सारखेच सुंदर बनूं व आम्हां दोघाचें सौंदर्य तुझ्या दिव्य सौंदर्यांत प्रतिबिंबित होऊं दे. आपण परस्परांकडे पहात असतां एकाचें स्वतःचें सौंदर्य दुसऱ्या-मध्ये दिसूं दे. तसेंच दोघांचे सौंदर्य वस्तुतः तुझेंच सौंदर्य असल्यामुळें माझें सौंदर्य तुझ्यांत विरून जाऊं दे. म्हणजे मग मी तुला व मला तुझ्या सौंदर्यांतच पाहीन. तूं मला तुझ्या सौंदर्यांत पाहशील कारण तुझें सौंदर्य तेंच माझें होईल व आपण एकमेकांस तुझ्या सौंदर्यांतच पाहूं " संतश्रेष्ठ प्लॉटिनसहि सांगतात की, "मनुष्य जर त्या एकरूप तत्त्वाशीं तल्लीन झाला, तर त्यामुळें त्यास एकरूपत्व प्राप्त होतें. त्या एकाची प्रतिमा बनून आपल्यापासून भिन्न झाला, म्हणजे तो जीवनप्रवासाचें अंतिम ठिकाण गांठतो व त्याचा प्रवास संपतो.




# MATUNGA CLEANING WORKS

**ESTD. 1934** *Prop.* **S. V. PRADHAN**

MODI NIWAS, BOMBAY 19

**Washers, Dyers and Dry Cleaners.**

**A Pleasure to You—A Satisfaction to Us**

**Chemical Cleaners, Super Fine Darners**

**Master Dyers**

*FOR*

**Cotton, Woollen, Silken & Jari Whole Cloths**

## ••• शोभती साईनाथ मंदिरीं •••

धन्य ती शिरडी नगरी खरी
शोभती साईनाथ मंदिरीं ।
नाथ ते उठतां सकाळीं
भक्तजन गाती भूपाळी
धरती काकड आरती करीं ॥ १ ॥

नित्य मग पुजापाठ करती
बहुविध वस्त्रां चढविती
फुलांच्या राशी त्या चरणावरीं ॥ २ ॥

भक्तिचा सोहळा तो आगळा
पुजिती साईनाथ भोळा
साईंची कृपा ती सर्वांवरी ॥ ३ ॥

## ★ साई, असूं दे तुझी सांवली ★

माझ्या चंद्रमौळी संसारी
साई, असूं दे तुझी सांवली ॥ १ ॥

पंचपक्वानें कोणी खावो
आणि नित्य तें तुजला देवो
माझ्या भातभाकरीवरी
साई, असूं दे तुझी अंगुली ॥ २ ॥

षोडषोपचारें पुजा करो कोणी
लाखों रुपये उधळो पूजनीं
माझ्या आसुसलेल्या नयनीं
साई, दिसूं दे तुझी मूर्ति ॥ ३ ॥

—**गोविंद केशव पेठकर**, नासिक




**श्री**मती सुमन पी. गोरे, जमशेदपूर इनर सर्कल रोड, पोष्ट कदमा, जमशेदपूर या लिहितात कीः

**मा**झे वडील परशुराम कृष्ण गोरे हे येथील टाटाचे भव्य कारखान्यांत नोकरीस आहेत. चालू जुलैचे ९ तारखेस एकाएकी त्यांना अर्धांगवायूचा झटका आलेने ते दिवशीं कसे तरी दोन प्रहरी कामावरून घरीं आले. नित्याप्रमाणें सर्व कामें केलीं. तसेच दुसरे दिवशीं रोजचे प्रमाणें कामावर गेले. संध्याकाळीं घरीं आले तो कालच्या झटक्यापेक्षां आजचा आलेला झटका तीव्र जाणवत होता. शेवटीं रात्री जवळच राहणारे डॉक्टर यांना बोलावून त्यांना वडिलांची प्रकृति दाखविली. डॉक्टरांनीं तावडतोब औषध दिले आणि सांगितले कीं, सकाळपर्यंत वाट पहा आणि उजाडताच हॉस्पिटलमध्यें जाऊन भरती करा. तेथें नेल्यानेच लवकर बरे होण्याची शक्यता आहे. डॉक्टरांचे हे उद्गार ऐकून आम्ही सर्वजण कोणत्या प्रसंगाला तोंड द्यावे लागणार म्हणून घाबरून गेलो. ती रात्र कशी तरी काढली, पण सकाळी पाहतात तो एक एक विचित्रच प्रकार दृष्टोत्पत्तीस येऊ लागले. ते म्हणजे माझे वडिलांना ह्या अचानक आलेल्या झटक्याचा परिणाम की काय, ते भ्रमिष्टासारखे वागू लागले. कपड्याची शुद्ध सुद्धा नव्हती. मग तावडतोब कंपनीचे डॉक्टराना बोलाविले. त्यानी माझे वडलाना तपासले आणि आपले बरोबर वडिलानाही हॉस्पिटलमध्यें दाखल करणेस घेऊन गेले. तेथें नेल्यानंतर वडिलाची प्रकृति पहिल्या दोन दिवसांत तर बघवेना अशी झाली होती. तिकडे डॉक्टरांचे इलाज चालू होते आणि आम्ही इकडे परमेश्वराजवळ नवस मागून घेऊन वडिलांची प्रकृति लौकर बरी करण्यास सागत होतो. असे करता करता २०-२२ दिवसानंतर डॉक्टरानी माझे वडिलांना तुम्ही घरीं जाऊ शकता असे सागितले. डॉक्टरानी अशी परवानगी कशी दिली ते डॉक्टरच जाणे; कारण वडिलाचे प्रकृतीत म्हणावा तितका फरक पडला नव्हता. त्याना डाव्या पायाने टेकून चालता येत नव्हते की त्या बाजूचे हाताने कोणतीही वस्तु उचलता येत नव्हती; की तो हात स्वतःचा स्वतःला या जागेवरून दुसऱ्या जागेवर ठेवता येत नव्हता. तरी पण डॉक्टरानी डिस्चार्ज केल्यामुळें नाइलाजाने वडिलांना घरीं आणावे लागले.

वडिलांना घरी आणल्यानंतर औषधोपचार केले. आता बराचसा फरक जाणवू लागला आहे. वडील जेव्हां हॉस्पिटलमध्यें होते तेव्हा त्यानी आपणास लौकर बरे वाटूं दे आणि डिस्चार्ज करू देत म्हणजे आपण श्री साईबाबांचे चरणीं दहा रुपये पाठवून प्रसाद व उदी मागवू असे म्हणाले होते. वडील घरी आलेनंतर त्यानीं बाबांचेकडे ५ रु. ५० पै. ची पाठवणी केली व प्रसाद, उदी व श्री साईचरित्र मागविलें. त्याप्रमाणे श्री दासगुणकृत श्री साईचरित्राचे चार अध्याय आले, पण उदी व प्रसाद का आला नाही म्हणून आम्ही वाट पहात होतो. या मुदतीत माझे वडील दर महिन्यास डॉक्टर तपासणीसाठीं हॉस्पिटलमध्यें जात होते. पण प्रत्येक वेळेला म्हणजे तीन खेपेला डॉक्टरानीं माझे वडिलांना फिट न करता अनफिट म्हणून सांगितले व तसा सर्टिफिकेटवर शेरा मारीत होते. इकडे आम्ही नेहमी बाबांचे उदी व प्रसादाची वाट पहात असू. तेव्हा आम्हांला असे वाटूं लागले की आम्ही १० रुपये पाठवूं म्हणन मागून घेतले आणि ५ रु. ५० पैसे पाठविले. मनांत विचार आला कीं, आपण जर आपल्या दिलेल्या शब्दाला जागलो नाही तर बाबातरी कसे आपलेकडे पहातील आणि त्यांची कृपातरी कशी होणार? हा विचार मनांत येतांच वडिलांनी बाबाचेकडे १० रु. पाठविणेस सांगितले, त्याप्रमाणें माझा भाऊ दि. १६।११।६५ रोजी सकाळीं पोस्टांत मनिऑर्डर करणेस गेला. मी त्यावेळी दरवाज्याचे आतील बाजूस घरी तादूळ निवडीत बसले होते. ती सकाळची ९–९॥ ची वेळ होती. एकाएकी कोणाच्या तरी आवाजाने माझे, आमच्या घराच्या गेटापाशीं लक्ष गेले. तो एक वृद्ध भिक्षेकरी दारात उभा राहिलेला पाहिला, आणि त्याला पाहतांच माझे तांदूळ निवडण्याकडील लक्ष उडून माझी नजर दरवाजापाशी असलेल्या त्या वृद्धावर केंद्रीत झाली. त्या वृद्धाचा चेहरा हुबेहूब बाबांचेसारखा, त्यांचेप्रमाणेंच डोकीला बांधलेले फडकेही त्या वृद्धाचे डोकीवर बाधले होते. माझी नजर त्यांचे चेहऱ्यावरून


## ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

**३६३, मंगळदास मार्केटसमार, मुंबई नं. २. टे. नं. २२८४४**

**तयार कपडे, सर्व प्रकारची होजियरी तसेंच टॉवेल्स, चादरी व पडद्यांचें कापड मिळण्याचें एकमेव ठिकाण. होलसेल व रीटेलर्स**

झालेचना. त्यांचे अंगांत काय होते वगैरेबद्दल मला कसलीच शुद्ध नव्हती, वेड्याप्रमाणेंच मी त्यांचेकडे सारखी पहात होते. त्याना कोणी भिक्षा घातली की नाहीं, ते किती वेळ होते, ते कोणत्या बाजूला गेले आणि केव्हां गेले याची मला काहींच शुद्ध नव्हती. बराच वेळ झाल्यानंतर दरवाजापाशी असलेला वृद्ध भिक्षेकरी जेव्हां दिसेनासा झाला तेव्हां माझी तंद्रा भंग पावली, आणि मी शुद्धीत आले. त्यानंतर आमचे देवघरात असलेल्या बाबाचे फोटोकडे पाहिले, आणि नंतर खात्री झाली की, जो वृद्ध भिक्षेकरी आला होता तो भिक्षेकरी नसून भिक्षेकरेच्या रूपातील बाबाच होते. आणि नंतर जस जसें आठवू लागले तेव्हा असे वाटू लागले की आपण उठून त्यांना भिक्षा का घातली नाहीं! एरवी, कोणताही भिक्षेकरी येवो त्यास मी सहसा कधीं रिकामें हाती पाठविले नव्हते आणि आज आपले हातून असे कां झालें! म्हणुन राहुन-राहून आश्चर्य आणि वाईट वाटत आहे. प्रत्यक्ष साईबाबा आले असतांनासुद्धा मला नमस्कार करण्याची शुद्ध राहिली नव्हती. म्हणून त्यानंतर येईल त्या भिक्षेकऱ्यास मी मनोमन नमस्कार करीत असते.

२ – ३ वर्षांपासून आमचे घरीं श्री साईबाबाचा फोटो असून आम्ही त्याची दर गुरुवारी आरती करतो. प्रसादाचा नैवेद दाखवितो. ४ – ५ महिने झाले. नित्यनियमाने मी दररोज बाबाची आरती वगैरे करीत असते. मला कोणते दुःख येवो वा सुख होवो. मी बाबाना सागत असते. आनंदांतसुद्धा मी बाबांना विसरत नाही. परवा झालेल्या बाबांच्या दर्शनानें माझा त्यांचेवरील विश्वास तर आणखीनच वाढला आहे माझे प्रत्येक बाबतीत मला बाबांचेकडून नेहमीच सहाय्य होत असते. आम्ही बाबाना जो दर गुरूवारीं नैवेद दाखवितो तो प्रसाद आम्ही बाबाचे फोटो व इतर देवादिकांच फोटोतील मुखात थोडासा चिकटावितो आणि नंतर तो प्रसाद आम्ही ग्रहण करतो. हा प्रसाद प्रथम प्रत्येक देवाचे तोंडांत देतों. हे अनुकरण मी माझे पुण्यास रहात असलेल्या मावशीकडून शिकले.

जे दिवशी भिक्षेकऱ्याचे रूपांत बाबांनी मला दर्शन दिले त्यावेळीं माझे आईनें बाबाना २ पैसे घातले व तो भिक्षेकरी जाताना हिंदीतून म्हणाला, " आपका बाबू अच्छा हो जायेगा " हे सर्व मला नंतर आईकडून समजले. त्यावेळी आई म्हणाली, त्या वृद्धाचा चेहरा बाबांचे सारखा दिसत होता. माझे वडील परवा २४ नोव्हेंबरला परत डॉक्टर तपासणीस हॉस्पिटलमध्यें गेले होत. तेव्हा कोणतेही कारण न दाखविता डॉक्टरानी माझे वडिलांना सांगितले माझे वडील अनफिट होते ते फिट झाले, आणि आनंदाची बातमी म्हणजे माझे वडील आज २५ नोव्हेंबरपासून कामावर जाऊ लागले.

बाबांनी भिक्षेकऱ्याच्या रूपांत येऊन जो आशीर्वाद दिला व त्याप्रमाणें माझे वडिलांना ८ दिवसांत बरें वाटलें ही बाबांची कृपा नव्हे कां ! म्हणजे बाबा हे भक्तांना अद्याप निर्गुणाचे सगुणत्व दाखवून भक्तांना अद्याप भेटतात. ही बाबाची लीला असलेनें मला बाबांनी दर्शन दिल्यापासून वरचेवर त्यांनीं घेतलेले भिकाऱ्याचे रूप वरचेवर माझे डोळ्यांसमोर येऊन डोळ्यातून नेहमीं आनंदाचे अश्रू येतात व कंठ भरून येतो. असें हे बाबांचे कौतुक करावें तेवढें थोडेच आहे. तात्पर्य हे कीं बाबा भक्तांच्या हाकेला नेहमींच ' ओ ' देतात व त्यांना संकटकाळीं मदत करतात.

---

## -★- सेतू -★-

मातीलाही कळेल बाबाऽ तुमच्या मनिचा हेतू ।। ध्रु ।।
धरती अंबर व्यापून राहिल । तुझ्या कृपेचा सेतू ।।
साईरे ! देवांचा देव तूं ।। १ ।।
धर्मांची जगिं असे विविधता । एकाचि सकलामधिं मानवता ।
व्यर्थ अहंता एक देवता । अंतर्यामी शोधून बघ तूं ।
साईरे ! देवाचा देव तू ।। २ ।।

## --तूंच खरा सोबती--

असार माया संसाराची, तूच खरा सोबती—साई, तू दे आम्हा सन्मति ।। ध्रु० ।।
दांभिकतेचा चाले गौरव या जगतावरती । स्वार्थांची ही सगळी नाती
कुणि न कुणाचा अंति ।। १ ।।
मोहपटल हें अवघे येथील—सारुनिया दूर ।। २ ।।
या धरतीवर तुझ्या कृपेचा वाहूं दे पूर ।। ३ ।।
कृपावंत तू तारक असशी । आणि मनाचा भोळा ।। ४ ।।
त्रिभुवन झालें तव चरणाशीं म्हणून अवघे गोळा ।। ५ ।।
संकटाची ती नसे तमा, तुज निजभक्तांची क्षिती ।
नाम तुझें घेता भक्तांना—भक्तांना सद्‌गति ।। ६ ।।

कवि. : बा भा. मगदूम




# नोव्हेंबर १९६५

या महिन्यात श्रीसाईबाबांचे समाधी दर्शनास बाहेरगांवची भक्त मंडळी नेहमी-प्रमाणें आली होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढें हजेरी दिली ती खालील प्रमाणें—

**कीर्तन**

श्री. द. दा. ऊर्फ नानासाहेब रासने यांनीं श्रीपुढें तीन कीर्तनें केलीं तसेंच सौ. वनमाला गोविंदराव रानडे एम्. ए. बी. टी. पुणें. तसेच श्री. ह. भ. प. हिंमतराव मोरे. ( तळेगांव, ता. चाळीसगांव ) पु. खा. तसेच श्री. ह. भ. प. रामचंद्र शंकर महामुनि, मु. अमळनेर व सौ. शोभनाबाई रा. महामुनि, अमळनेर पू. खा. श्रीमंदिरांत कीर्तनें झालीं.

**गायन**

श्री. अमिचंदजी मास्तर, मु. मुलुंड, जि. ठाणें. कुमारी अलकनंदा गोविंदराव रानडे, पुणें. श्री. नाथा धोंडिबा जगधने अहमदनगर. सौ. शकुंतला मोरेश्वर जोशी, नाशिक. कु. विमलबाई भाऊसाहेब राजशिर्के, जळगांव. पू. खा. श्री. काशिनाथ जोशी, वाकोला मुंबई ५५.

**तबलावादन**

श्री. रघुनाथ तात्याबा मोरे, मुंबई ( गंगाधर नाटय मंडळी ) माजी तबलजी.

**नृत्य व जादुप्रयोग**

श्री. रामास्वामी, टी. आर. सुंदरम्. पी. आर. सुनीता माटुंगा मुंबई.

**साईसंस्थान नोकर भजन मंडळ**

या महिन्यांत साईसंस्थान नोकर भजनी मंडळ दोन भजनाचे कार्यक्रम झाले.

**मोठ्यांच्या भेटी**

मे. अभ्यंकरसाहेब हायकोर्ट जज्ज मुंबई.
मे. के. पुट्टस्वामी सहकार मंत्री म्हैसूर.
मे. जमखंडीमठ सी. ए. रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह डि. म्हैसूर.
मे. चिन्मुळगुंद रजिस्ट्रार फॉर को-ऑपरेटिव्ह अहमदनगर.
मे. साठेसाहेब ( संरक्षण खाते ) जाईंट सेक्रेटरी भारत स. दिल्ली
मे. इत्यंगडीसाहेब सिटी सिव्हील आणि सेशन जज्ज मुंबई.
मे. डब्ल्यु. के. पाटील डी. आय्. जी. ऑफ पोलीस मुंबई.
मे. भावेसाहेब डी. एस. पी. अहमदनगर.
मे. डी. आर. खडके. असि. पोलीस कमिशनर मुंबई.

# नामदेवांची वाणी

अनुवादक : गणेश विष्णु कविटकर, एम्. ए.

## पाखंड भक्ति

रामकी भगति दुहेली रे बापा ।
सकल निरंतर चिन्हीले आपा ॥ १ ॥
बाहिर उजैला भीतरीं मैला ।
पानी पखारत पर न गहिला ॥ २ ॥
पुतला देवकी पाती देवा ।
दुईं बिध नाम न जानै सेवा ॥ ३ ॥
पाखंड भगति राम नहिं रीझै ।
बहरा आंधा लोग पती जे ॥ ४ ॥
नामदेव भणे मोरे नैन पलटा ।
राम चरना चित्त बहु पैठा ॥ ५ ॥

**अर्थः**—अरे ! रामभक्तीचा सुकाळ होऊं लागला आहे. बावा !! सर्व अंगावर आपण होऊन राममुद्रांकित केलें आहे. पण अंतरंगात मळ आहे, दोष आहेत. पाण्यानें वरवर प्रक्षाळलें परंतु अहंकार गेला नाहीं. बाहुल्याच्या देवी केल्या आणि पत्र्यांचे देव केले पण या दोन्ही प्रकाराचे नाम व सेवा जाणत नाहींस. अशा पाखंडी भक्तीनें राम प्रसन्न होत नाहीं. आंधळे व बहिरे एकवेळ फसतील. नामदेव म्हणतात माझे नेम पालटले आहेत व चित्त रामचरणीं लागून राहिलें आहे.

---

॥ श्रीसाईनाथ प्रसन्न ॥

# महिला वस्तु भांडार

भरतकाम, विणकाम, शिवणकाम
यांस लागणारें सर्व साहित्य व भरतकामाचीं पुस्तकें
लोंकर, गंगावनें आणि सौंदर्यप्रसाधानांचे व्यापारी.
छबीलदास रोड, दादर, मुंबई २८. (वेस्टर्न रेल्वे)
※ आमची कोठेंही शाखा नाहीं. ※

## Books published and Sold by Sai Baba Sansthan, Shirdi

## श्री साईबाबा संस्थान, शिरडी संस्थेतर्फे प्रकाशित व विक्रीकरितां ठेवलेली पुस्तकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (१) | श्रीसाईसच्चरित्र | (मराठी) | श्री. दाभोळकरकृत | ७-०० |
| (२) | ,, | (हिंदी) | श्री. ठाकुर | ४-५० |
| (३) | ,, | (गुजराथी) | श्री. सोमपुरा | ३-७५ |
| (४) | ,, | (इंग्रजी) | Shri Gunaji | ४-०० |
| (५) | ,, | (Kannad) | N S Anantha Raum | ३-०० |
| (६) | **Glimpes of Indian Spirituality** | | by Pradhan | १-०० |
| (७) | **Glimpes of Indian Spirituality** | (Telgu) | | १-०० |
| (८) | श्री साईलीलामृत | (मराठी) | श्री. आगास्करकृत | २-०० |
| (९) | ,, | (हिंदी) | श्री. चिटणीस-दिल्ली | २-५० |
| (१०) | साईबाबा-अवतार व कार्य | (मराठी) | श्री. धोंड | २-०० |
| (११) | साईबाबांचे ४ अध्याय | (मराठी) | श्री. दासगणू | ००-५० |
| (१२) | सगुणोपासना | (मराठी) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१३) | ,, | (गुजराथी लिपींत) | श्री. भीष्म | ००-२५ |
| (१४) | श्री रुद्राध्याय ११ वा | (मराठी) | श्री. दाभोळकर | ००-१२ |
| (१५) | स्तवन-मंजरी | (मराठी) | श्री. दासगणू | ००-१३ |
| (१६) | श्री साई-सुमनांजली | (मराठी १०८ नावें) | | ००-०६ |
| (१७) | कीर्तन पंचक | (मराठी) | श्री. देव | १-५० |
| (१८) | शीलधी | (मराठी) | डॉ. गव्हाणकर | ००-७५ |
| (१९) | श्री साईगीतांजलि | (मराठी) | कवि श्रीपाद | ००-१२ |
| (२०) | **Spiritual Symphony** | | by R. S. Harshad Mehta | २-५० |
| (२१) | **Side lights on Sai Baba** | (Eng.) | Calcutta | ००-७५ |
| (२२) | **Guide to Shirdi** | (English) | | ००-१२ |
| (२३) | स्तवनमंजिरी व सुमनांजली | (मराठी) | | ००-२० |

### Colour pictures of Sai Baba by Neroy

| | | |
|---|---|---|
| (1) | Baba sitting on Stone 15" × 20" Thick | **1-00** |
| (2) | ,, ,, ,, 9½" × 13½" medium | **00-37** |
| (3) | ,, ,, in Dwarkamai 9½" × 13½" medium | **00-50** |

Other different poses of Sai Baba in colour according to different sizes varying in prices

Commission to Sellers 25% except on 2 to 10 for which only 25 nP. and 37 nP. for No. 1 Postage Extra (minimum purchase of Rs 15). *Can be had from* (मागवा):

1. **Executive officer Shri Sai Baba Sanstan,**
   P. O Shirdi Dst Ahmednagar
2. **Sai Baba Office 'Sai Niketan',**
   Dr Ambedkar Road, Dadar, Bombay 14

मालक : **श्री साईबाबा संस्थान, शिरडी,** आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४ करिता
प्रकाशक : श्री ... मुंबई १४

Regd. No. B 7989




★

संगीताची मोहिनी माणसाला मंत्रमुग्ध करते. त्याचप्रमाणें कुठल्याहि हृदयंगम चित्राची मुद्रणकृति वाचकाला नयनमुग्ध करते!

★

आणि म्हणूनच

हाफ-टोन, लाईन, थ्री अँड फोर कलर ब्लॉक्स,
ऑफसेट प्लेटस्, स्टीरियोज इत्यादि
आणि त्याचप्रमाणें वैशिष्ट्यपूर्ण
सर्वांगसुंदर कॅलेंडर्ससाठीं—

# डी. डी. नेरॉय

५३४, सँडहर्स्ट ब्रिज, चौपाटी, मुंबई
टेलिफोन : ७५०४७


डी. डी. नेरॉय यांनीं खास तयार केलेले श्री साईबाबाचीं तीन रंगी चित्रे, द्वारकामाई व दगडावर बसलेले — साईज ६ × ८, १० × १४, १४ × २० खालील ठिकाणीं मिळण्याची खास व्यवस्था केली आहे.

**श्री साईबाबा संस्थान**

मु. पो. शिर्डी, जि. अहमदनगर व
साईनिकेतन, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

मुद्रक: श्र. कृ. सापळे, रामकृष्ण प्रिंटिंग प्रेस, मोरबाग रोड, दादर, मुंबई १४.
संपादक व प्रकाशक: बी. जी. पोतनीस, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ.